RNI NO. MAHMAR/2020/84035




BAHUJAN SAURABHA

# बहुजन सौरभ




सोमवार, ०२ जून २०२५ | वर्ष : ५ | अंक : १५५ | दैनिक | किंमत : ₹ ५/-

Monday, 02 June 2025 | Year : 5 | Issue : 155 | Daily | Rate: Rs. 5/-

# आठवा वेतन आयोगाला होऊ शकतो उशीर



**नवी दिल्ली :** मे महिना संपला आहे. यामुळे आता 1 जानेवारी 2026 या डेडलाइननुसार 8वा वेतन आयोग लागू होण्यास केवळ 7 महिनेच शिल्लक राहिले आहेत.

आठवा वेतन आयोग लागू होण्यास होऊ शकतो उशीर, जानेवारी 2026 पासून निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांचे काय होणार?

केंद्र सरकारने गेल्या जानेवारी महिन्यात 8व्या वेतन आयोगाला मंजुरी दिली. यानंतर, संदर्भ अटी आणि संभाव्य आयोगाच्या सदस्यांच्या काम सुरू करण्याच्या पद्धतीला अंतिम रूप देण्याच्या दृष्टीने संबंधित अधिकाऱ्यासोबत चर्चाही सुरू करण्यात आली होती. मात्र, सरकारने अद्याप आयोगाचे अध्यक्ष आणि इतर सदस्यांच्या नियुक्तीची अधिकृत घोषणा केलेली नाही. गेल्या महिन्यात एक परिपत्रक जारी करण्यात आले होते, त्यात प्रतिनियुक्ती आधारावर सुमारे 35 पदे भरण्याच्या सरकारच्या प्रस्तावाची माहिती देण्यात आली होती. ही पदे भरण्यासाठी पात्र सरकारी कर्मचाऱ्यांकडून अर्ज मागवण्यात आले होते. तेव्हापासूनच TOR ला अंतिम स्वरूप देण्यासंदर्भात आणि सदस्यांच्या नियुक्त्यांसंदर्भात माध्यमांत बातम्या येत आहेत.

1 जानेवारी 2026 -

मे महिना संपला आहे. यामुळे आता 1 जानेवारी 2026 या डेडलाइननुसार 8वा वेतन आयोग लागू होण्यास केवळ 7 महिनेच शिल्लक राहिले आहेत. सध्याच्या 7व्या वेतन आयोगाचा कार्यकाळ 31 डिसेंबर 2025 रोजी संपत आहे. यासंदर्भातील आतापर्यंतची प्रगती बघाता, सरकार 8वा वेतन आयोग वेळेवर लागू करू शकले का? हे सांगणे अवघड आहे. गत वेतन आयोगांच्या प्रक्रियेकडे पाहता, शिफारशी लागू करण्यासाठी साधारणपणे 12 ते 18 महिने एवढा कालावधी लागतो.

1 जानेवारी 2026 अथवा त्यानंतर निवृत्त होणाऱ्या सरकारी कर्मचाऱ्यांवर काय परिणाम होईल? अशा एकूण परिस्थितीत 8वा वेतन आयोग 1 जानेवारी 2026 पासून लागू होण्याची शक्यता कमी आहे. यामुळे आता प्रश्न असा निर्माण होतो की, डेडलाईनपर्यंत वेतन आयोग लागू झाला नाही, तर 1 जानेवारी 2026 अथवा त्यानंतर निवृत्त होणाऱ्या कर्मचाऱ्यांना याचा लाभ मिळेल का? तर याचे उत्तर 'हो' असे आहे. अशा सर्व कर्मचाऱ्यांना थकबाकीच्या स्वरूपात सुधारित वेतनाचा लाभ मिळेल. असे हे यापूर्वीही घडले आहे. 7 व्या वेतन आयोगाच्या वेळी सुमारे एक वर्षाचा विलंब झाला होता, परंतु सर्व कर्मचारी आणि पेन्शनधारकांना थकबाकी मिळाली होती.

## युपीआयपासून ते एटीएमपर्यंत 1 जूनपासून ग्राहकांच्या खिशाला लागणार कात्री?




**नवी दिल्ली :** जूनचा महिना तुमच्या बजेटच्या दृष्टीकोनातून महत्त्वाचा असणार आहे, एक जून 2025 पासून आर्थिक सेवा क्षेत्राशी संबंधित आणि ऑनलाई ट्राझेक्शन संदर्भातील अनेक नियमांमध्ये बदल होणार आहेत. यामध्ये बँक एफडी, क्रेडिट कार्ड, एलपीजी गॅस, पीएफ विड्रॉल, आधार कार्ड, एटीएम आणि म्युचुअल फंड संदर्भातील नियमांमध्ये बदल होणार आहेत, ज्याचा थेट परिणाम हा ग्राहकांच्या खिशावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे आता पीएफचे पैसे काढणे आणखी सोपे होणार आहे. एवढेच नाही तर केवायसी अपडेट आणि क्लेम प्रोसेस देखील पहिल्यापेक्षा अधिक गतिमान होणार आहे. विशेष म्हणजे तुम्हाला ईपीएफओ कार्ड हे एटीएम कार्डप्रमाणे वापरता येणार आहे.

**एफडीच्या व्याज दरात बदल :** आरबीआयकडून रेपे रेटमध्ये संभाव्य कपातीच्या पार्श्वभूमीवर बँकांकडून एफडीचे व्याजदर कमी होण्याची शक्यता आहे. याचा थेट परिणाम हा ग्राहकांवर होणार आहे.

**एलपीजी गॅस सिलिंडरचे दर बदलणार :** प्रत्येक महिन्याच्या एक तारखेला गॅस सिलिंडरचे नवे दर जारी केले जातात, या महिन्यात गॅस सिलिंडरचे दर वाढल्यास त्याचा देखील फटका बसू शकतो.

**एटीएम ट्राझेक्शनवरील चार्ज वाढण्याची शक्यता :** दरम्यान एक जूनपासून एटीएम ट्राझेक्शनच्या नियमांमध्ये देखील बदल होण्याची शक्यता आहे, चार्ज वाढू शकतात, अशा परिस्थितीमध्ये जे ग्राहक वारंवार एटीएम कार्डाचा वापर करतात त्यांना मोठा फटका बसण्याची शक्यता आहे.

**फ्री आधार अपडेटची डेडलाईन :** 14 जून 2025 पर्यंतच तुम्ही तुमचे आधार फ्रीमध्ये अपडेट करू शकता, त्यानंतर त्यावर चार्ज आकारला जाणार आहे.

**युपीआय नियमांमध्ये बदल :** युपीआयच्या माध्यमातून होणाऱ्या आर्थिक व्यवहारांच्या नियमांमध्ये देखील काही बदल होण्याची शक्यता वर्तवली जात आहे

## ताडोबा कार्यालय परिसरात बस सेवेचे उदघाटन



**चंद्रपूर :** चंद्रपूर ते मोहर्ली व मोहर्ली ते चंद्रपूर अशी 40 आसनाची बस सेवा पर्यटकांच्या सेवेत रविवार 1 जून पासुन सुरू झाली आहे. आमदार किशोर जोरगेवार यांच्या हस्ते या सेवेची सुरूवात विधीवत उद्घाटन रविवार 1 जून रोजी झाली. ही बससेवा क्रुझर सफारी तिकीटचे बुकिंग आहे त्यांच्यासाठीच आहे. दरम्यान क्रुझरला पर्यटकांचा चांगला प्रतिसाद असून दोन वर्षात 58 हजार पर्यटकांनी क्रुझर मधून ताडोबात जंगल सफारीचा आनंद लुटला आहे. ताडोबा कार्यालय परिसरात बस सेवेचा उदघाटन सोहळा पार पडला. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्यासह मुख्य वनसंरक्षक डॉ. जितेंद्र रामगावकर, ताडोबाचे क्षेत्र संचालक तथा वन संरक्षक डॉ. प्रभु नाथ शुल्का, ताडोबा बफर उपसंचालक कुशाग्र पाठक, सहायक वनसंरक्षक विवेक नातू, वनपरिक्षेत्र अधिकारी अरूण गोंड, वनपरिक्षेत्र अधिकारी संतोष थीपे, वनपरिक्षेत्र अधिकारी स्वाती महिसकर तसेच वन कर्मचारी उपस्थित होते.

## मोसमी पावसाचा प्रवास 10 जूनपर्यंत रखडणार



**नागपूर :** हवामान शास्त्रज्ञांचा अंदाज खरा ठरला असून मोसमी पावसाचा प्रवास किमान 10 जूनपर्यंत तरी रखडला आहे. केवळ पश्चिम किनारपट्टी व राज्यातील काही भागात हलक्या पावसाची शक्यता आहे. वातावरणात बदल झाला असून मोसमी पावसाच्या प्रवासाची गती कमी झाली आणि आता मोसमी पावसाचा प्रवास पूर्णपणे रखडला आहे. किमान दहा जूनपर्यंत तरी मोसमी पाऊस पुढे सरकण्याची कोणतीही शक्यता नाही. केवळ पश्चिम किनारपट्टी व राज्यात काही भागात हलका पाऊस पडण्याचा अंदाज आहे. राज्यातील बहुतांश भागात मात्र कोरडे हवामान राहण्याची शक्यता आहे. वातावरणातील या बदलांमुळे कमाल तापमानात वाढ होईल. विदर्भात तापमानाचा पारा पुन्हा 40 अंश सेल्सिअसपर्यंत राहण्याची शक्यता आहे. मराठवाडा व खानदेशात देखील कमाल तापमान 35 ते 40 अंश सेल्सिअस पर्यंत राहील. या कोरड्या हवामानाचा वाईट परिणाम पेरणी आणि लागवडीवर पडण्याची शक्यता आहे. त्यामुळे शेतकऱ्यांनी पेरणी आणि लागवडीची घाई करू नये, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.




महाबोधी महाविहार मुक्ती आंदोलनाच्या संदर्भात नागपूरात बेजनबाग मैदानावर रविवारी जाहीर सभा झाली. या सभेला मुख्य अतिथी ऑल इंडिया बुद्धिस्ट फोरमचे जनरल सेक्रेटरी आकाश लामा यांनी संबोधित केले. याप्रसंगी अध्यक्षस्थानी भदंत चंद्रकीर्ती आणि मान्यवर उपस्थित होते. तसेच नागपूरातील बौद्ध अनुयायी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विचारवंतांना मैदानात उतरावे लागेल : डॉ. बाबा आढाव




**पुणे :** महाराष्ट्रातील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते असलेले डॉ. बाबा आढाव कष्टकऱ्यांचे नेते म्हणून ओळखले जातात. डॉ. बाबा आढावांवर महात्मा फुले यांच्या सत्यशोधकी विचारांचा खोलवर प्रभाव होता. त्यातूनच त्यांनी हमाल पंचायत सारख्या संघटनेची स्थापना केली. जातीय भेदभावाला विरोध म्हणून त्यांनी महाराष्ट्रभर एक गाव एक पाणवठा ही चळवळ चालवली. त्यांनी जातीभेद, महिलांचे हक्क, प्रबोधनाची चळवळ, परिवर्तनवादी चळवळीपुढची आव्हाने, विचारवंतांची भूमिका याबाबत मांडणी केली आहे.

## अवकाळी पावसामुळे भाजीपाल्याचे दर कडाडूनही शेतकऱ्यांचा खिसा मात्र रिकामाच...



**गोंदिया :** यंदा कधी नव्हे ते मे महिन्यातच पावसाचे आगमन झाले. खरे तर मे महिना हा अत्यंत तप्त उन्हाचा असतो. मात्र, यंदा मे महिन्यातच जिल्ह्यात पावसाने जोर धरला. त्यामुळे उन्हाळ्यातील भाजीपाला पिकाचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले. परिणामी, बाजारपेठेत भाज्यांचे दर वाढले आहेत. गोंदिया जिल्ह्यात ही भाजीपाला पिकाचे उत्पादन घेतले जाते. पण या सोबतच शेजारील भंडारा, नागपूर, चंद्रपूर, यवतमाळसह अन्य जिल्हे व इतर राज्यांतूनही येथे भाजीपाला आयात केला जातो. मात्र, गेल्या आठवड्यात झालेल्या अवकाळी पावसाचा फटका बसल्याने भाजीपाल्याची आता टंचाई निर्माण झाली आहे. अन्य जिल्ह्यांतून, राज्यातून येणाऱ्या भाजीपाल्याला ब्रेक लागला आहे. त्यामुळे जो भाजीपाला येत आहे, तो घाऊक बाजारात महागड्या दरात ग्राहकांना विकला जात आहे. एकंदरीत कमी दरात शेतकऱ्यांकडून भाजीपाला खरेदी करून व्यापारी ते जादा दरात लहान विक्रेत्यांना विकत आहेत. हे विक्रेते देखील आपली मर्जीने त्यापेक्षा अधिक दराने ग्राहकांना भाजीपाला विकत आहेत. ठोक बाजार पेठेतच भाजीपाल्याचे दर वाढल्याने भाजीपाला महाग विकावा लागत असल्याचे स्थानिक भाजीपाला विक्रेते सांगत आहेत.

## हेरगिरी केल्याप्रकरणी दिल्ली पोलिसांनी ठोकल्या बेड्या



**नवी दिल्ली :** पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या प्रकरणात काहींना अटक करण्यात आल्याच्या घटना मागील काही दिवसांपासून समोर येत आहेत. काही दिवसांपूर्वी यूट्यूबर ज्योती मल्होत्राला पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याप्रकरणी अटक करण्यात आली. त्यानंतर एनआयएने कारवाई करत पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली दिल्लीतून एका जवानाला अटक केले होते. त्यानंतर आणखी एक घटना समोर आली होती, राजस्थानमधून एका सरकारी कर्मचाऱ्याला हेरगिरी केल्याच्या प्रकरणात पोलिसांनी अटक केलह्य होते. यानंतर आता आणखी एक घटना समोर आली आहे. दिल्ली पोलिसांच्या विशेष पथकाने शनिवारी पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणांना भारतीय सिम कार्ड पुरवल्याच्या आरोपाप्रकरणी आणखी एका व्यक्तीला अटक केल्याची माहिती समोर आली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, अटक करण्यात आलेल्या व्यक्तीचे नाव हसीन (42) असे आहे. तो राजस्थानमधील डीग जिल्ह्यातील रहिवासी आहे. हा आरोपी कासिमचा मोठा भाऊ असून त्याला दोन दिवसांपूर्वी हेरगिरी केल्याच्या आरोपाखाली अटक करण्यात आली होती.




## ऑपरेशन सिंदूरवरील पोस्ट : शर्मिष्ठा पानोलीची अटक ही अभिव्यक्तीला कलंक




**कोलकाता :** पुण्यात कायद्याचे शिक्षण घेत असलेल्या शर्मिष्ठा पानोली नावाच्या 22 वर्षीय विद्यार्थिनीला शुक्रवारी रात्री कोलकाता पोलिसांनी गुरुग्राम येथून अटक केली. या विद्यार्थिनीवर ऑपरेशन सिंदूरवरील पोस्टला उत्तर देताना आक्षेपार्ह टिप्पणी केल्याचा आरोप आहे. शर्मिला हिच्या अटकेसंदर्भात कोलकाता पोलिसांच्या बचावात्मक भूमिकेमुळे आता राजकीय पक्षांनी यामध्ये उडी घेतली आहे. शर्मिष्ठा हिची अटक बेकायदा असल्याचे अनेक सोशल मीडिया वापरकर्त्यांनी म्हटले आहे. कोलकाता पोलिसांनी शर्मिला हिला बेकायदा अटक केली असून, तिच्यावर कठोर कारवाई केली जात असल्याचा आरोप इतर वापरकर्त्यांनी केला आहे. कोलकाता पोलिसांनी या संदर्भात एक निवेदन जारी केले आहे. त्यामध्ये बेकायदा अटक करण्यात आल्याचे कथन पूर्णपणे चुकीचे आणि दिशाभूल करणारे, असे सांगण्यात आले आहे. 'सर्व कायदेशीर प्रक्रियांचे योग्य पालन करण्यात आले. नोटीस बजावण्याचे सर्व प्रयत्न करण्यात आले; मात्र ती प्रत्येक वेळी फरारी असल्याचे आढळले. परिणामी न्यायालयाने अटक वॉरंट जारी केले. त्यानंतर तिला गुरुग्राम इथून कायदेशीररीत्या अटक करण्यात आली. त्यानंतर तिला योग्य दंडाधिकाऱ्यांसमोर हजर करण्यात आले पानोलीने सोशल मीडियावर एक व्हिडीओ पोस्ट केला होता, जो आता डिलीट करण्यात आला आहे. या पोस्टमध्ये तिने बॉलीवूड कलाकारांवर ऑपरेशन सिंदूरवर मौन बाळगल्याचा आरोप करताना जातीयवादी टिप्पणी केल्याचा आरोप केला होता. तिच्या व्हिडीओमुळे मोठ्या प्रमाणावर संताप व्यक्त करण्यात आला. अनेक वापरकर्त्यांनी तिच्यावर टीका केली, तसेच तिला धमकीचे संदेशही पाठवले. पानोलीच्या अटकेनंतर राजकीय नेत्यांनी तीव्र टीका केली.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कॉन्व्हेन्शन सेंटर समोरील महापुरुषांच्या पुतळ्याची अवहेलना

**संवाद मित्र उज्वला गणवीर, नागपूर :** उत्तर नागपूर स्थित डॉ. बाबासाहेब आंबेडकर इंटरनॅशनल कॉन्व्हेन्शन सेंटर येथे एक कार्यक्रमानिमित्त जाणे आले. सेंटर अतिशय पॉश आणि विशाल आहे. नुकताच पाऊस येऊन गेला होता. सेंटरच्या बाहेर गेटवर पाणी साचलेले होते कसे तरी तिथून आतमध्ये गेलो आम्ही! बाजूला बघितले तर सेंटरच्या बाहेर डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि तथागत बुद्धांचा पुतळा दिसला. पुतळ्याच्या आजूबाजूला पाणी साचलेले दिसले. आजुबाजुला चौकशी केली असता त्यांनी सांगीतले की हे गटाराचे पाणी आहे. दोन्ही पुतळे या घाण पाण्याने वेढलेले होते. बघून फार वाईट वाटले. या सेंटरच्या सभागृहात दररोज आंबेडकरी चळवळीचे कार्यक्रम होत असतात परंतु हे कोणालाच कसे दिसले नाही? कार्यक्रमात आपल्या समाजातील अतिशय दिग्गज वक्ते होते. मजेची बाब म्हणावे की खेदाची गोष्ट म्हणावे कळत नाही, मात्र आत मध्ये कार्यक्रमात त्या भागातील आमदारसुद्धा होते.



बघूव काळजातून वेदना झाल्या आपल्याच सभागृहाबाहेर डॉ. बाबासाहेब आणि बुद्धांचे पुतळे घाण पाण्यात उभे आहेत. कदाचित हे पावसाळ्यातील दरवर्षीचे चित्र असावे.

तसे बघता कन्व्हेन्शन सेंटर समोर तथागत आणि डॉ. बाबासाहेबांच्या पुतळ्याची काही आवश्यकता नाही. फारसे मोठेसुद्धा नाहीत. पुतळ्यांचे व्यवस्थापन होऊ शकत नसेल तर एखाद्या विहाराला दान करून घ्यावे. विहार समिती काळजी घेईल.

काल परत एक व्हिडिओ समाज माध्यमावर व्हायरल झाला. सेंटरचे महिला कर्मचारी खिडकी उघडी ठेऊन हॉल च्या आत मध्ये पावसाचे पाणी आत येत आहे ती महिला नाचत आहे. फार गंभीर आहे हे...

समाजातील एक प्रतिष्ठित सामाजिक कार्यकर्त्या यांनी सुद्धा या संदर्भात अत्यंत खेद व्यक्त केला आणि ते गडराचेच पाणी कसे साचलेले आहे याबद्दल सुद्धा सांगितले आहे. त्या भागातील सुजाण नागरिकांनी पुढाकार घेऊन लवकरात लवकर यावर उपाय करावा.

जेणेकरून महापुरुषांच्या पुतळ्यांची अशा प्रकारे अवहेलना होणार नाही.

## संपादकीय

# हनी ट्रॅप आणि देशाशी गद्दारी...

तरुण मुलांसोबत अश्लील चॅटिंग करून त्यांना जाळ्यात ओढणे आणि नंतर त्यांच्याकडून अश्लील कृत्ये करून घेणे ते करतांना त्याचे व्हिडीओ रेकॉर्डिंग करणे. ते व्हिडीओ रेकॉर्डिंग व्हायरल करण्याची धमकी देऊन त्यांच्या कडून लाखो रुपयांची खंडणी वसूल करणे असा हातखंडा सायबर माफियांनी काही दिवसांपासून अवलंबला आहे. हाच हातखंडा आता पाकिस्ताननेही वापरला असून भारतातील संरक्षक विषयक महत्वाच्या पदावर असलेल्या व्यक्तींना सुंदर ललनांच्या जाळ्यात अडकवून त्यांच्यामार्फत भारतातील संरक्षक विषयक महत्वाची माहिती गोळा केली जात आहे. इंस्टाग्रामच्या माध्यमातून एका महिलेने व्यावसायिकाला हनी ट्रॅपमध्ये अडकवले. अश्लील फोटो व्हायरल करणे आणि लैंगिक अत्याचार केल्याची तक्रार न करण्यासाठी 50 लाख रुपयांची खंडणी मागितली. पीडित व्यावसायिकाने कंटाळून पोलिसात तक्रार केली. पोलिसांनी गुन्हा नोंदवून महिलेसह 4 आरोपींना अटक केली. पुण्यातील संरक्षण संशोधन संस्थेचे (DRDO) संचालक प्रदीप कुरुळकर हनी ट्रॅपमध्ये (Honey Trap Case) अडकले आहेत. त्यानंतर कुरुळकर यांना निलंबित करण्यात आले. आता या प्रकरणात नागपूरचा रहिवासी असलेल्या निखिल शेंडेचे नावदेखील समोर आले आहे. कुरुलकर देशाची संवेदनशील माहिती लीक करत असल्याचे सिद्ध झाल्यानंतर त्यांना डी.आर.डी.ओ.च्या संचालकपदावरून हटवण्यात आले. गुप्तचर यंत्रणांकडून त्यांच्याविरुद्ध माहिती मिळाल्यानंतर डी.आर.डी.ओ.ने तपास सुरू केला. या तपासात ते पाकिस्तानी हेरांच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाले. पाकिस्तानी गुप्तचर संस्थांना हनी ट्रॅप करण्याचा प्रयत्न करणारा हवाई दलातील हवालदार निखिल मुरलीधर शेंडे हा मूळचा नागपूरचा आहे. निखिलची आई आणि काका शांतीनगर परिसरात राहतात. यासंदर्भातील वृत्त वाचून धक्का बसल्याचे निखिलच्या नातेवाईकांचे म्हणणे आहे. स्पोर्ट्स कोट्यातून हवाई दलात अधिकारी झालेल्या निखिलचे मैदान आणि घर हेच विश्व असल्याची भावना निखिलच्या आईने व्यक्त केली. डी.आर.डी.ओ.चे शास्त्रज्ञ प्रदीप कुरुळकर हनी ट्रॅपमध्ये अडकले आहेत. आता या प्रकरणात निखिल शेंडेचे नाव समोर आल्याने खळबळ उडाली आहे. निखिल शेंडे हा धावपटू आहे. कुरुळकर यांना निखिलच्या मोबाईलवरून ‘माझा मोबाईल का ब्लॉक केला आहे’ असा मेसेज आला, त्यानंतर निखिलची चौकशी करण्यात आली. दरम्यान, निखिल निर्दोष असल्याचा दावा त्याच्या कुटुंबीयांनी केली आहे. त्याला केवळ चौकशीसाठी बोलावण्यात आले होते, आता त्याची सुटका करण्यात आली आहे. निखिलचा अशा कोणत्याही प्रकरणाशी काहीही संबंध नसल्याचा दावा त्याच्या आईने केला आहे. दरम्यान, कुरुलकर 2022 पासून पाकिस्तानी हेरांच्या संपर्कात असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाने (ATS) त्याला अधिकृत गुप्त कायद्यांतर्गत पुण्यातून अटक केली. महत्त्वाच्या पदावर असतांनाही कुरुळकर यांनी आपल्या पदाचा गैरवापर करून संवेदनशील माहिती लीक करून देशाच्या सुरक्षेशी तडजोड केली. मुंबईतील एटीएसच्या काळाचौकी युनिटमध्ये अधिकृत गुप्तता कायद्याच्या संबंधित कलमांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अशीच संरक्षक विषयक महत्वाची माहिती पाकिस्तानला पुरवणारा रवीकुमार वर्मा या तरुणाला पोलिसांनी नुकतेच जेरबंद केले. रविकुमार वर्मा हा एक नव्हे तर दोन पाकिस्तानी महिलांच्या संपर्कात होता. त्याने या दोन्ही महिलांना सोशल मिडियाच्या माध्यमातून वेळोवेळी भारतीय नौदल आणि डॉकयार्ड मधील पाणबुड्या व जहाजांची संवेदनशील माहिती पाकिस्तानला पाठवली होती असे एटीएसच्या चौकशीतून समोर आले आहे. रविकुमार वर्मा हा नेव्हल डॉकमध्ये ज्युनियर मेकॅनिकल फिटर इंजिनियर होता. पाकिस्तानी महिलांची रविकुमार वर्माशी सोशल मीडियावर ओळख झाल्यानंतर या महिलांनी त्याच्यासोबत अश्लील चॅटिंग करून आम्ही तुला प्रत्यक्ष भेटणार आहोत अशी भुरळ घालून त्यास या महिलांनी सतत गुंतवून ठेवले होते. त्याची आर्थिक परिस्थिती बिकट असल्याने या महिलांनी त्याला आर्थिक मदतही केली. पाकिस्तानमधून त्यांच्या बँक अकाऊंटवर पैसे जमा झाल्याचेही स्पष्ट झाले आहे. रविकुमार वर्माच्या या कारनाम्याने देशभर खळबळ उडाली आहे अर्थात हनी ट्रॅपमध्ये अडकून देशाशी गद्दारी करणारा रविकुमार वर्मा हा पहिला व्यक्ती नाही. मागील वर्षीच डी.आर.डी.ओ. या देशाचे संरक्षण साहित्य तयार करणाऱ्या संस्थेत शास्त्रज्ञ असलेल्या डॉ. प्रदीप कुरुलकर या व्यक्तीला पोलिसांनी पाकिस्तानला देशाच्या संरक्षणासंदर्भात गुप्त माहिती पुरवल्याच्या आरोपाखाली अटक केली होती.शित्रूराष्ट्राच्या गोटात शिरून त्यांच्याकडून गुप्त माहिती काढून घेणे यासाठी महिलांचा वापर करणे हे पूर्वीपासूनच चालत आले आहे. सर्वच देश हे करतात मात्र आता माहिती तंत्रज्ञान युगात हे करणे अधिक सोपे झाले आहे कारण सोशल मीडियाच्या माध्यमातून अशा महत्वाच्या पदावरील व्यक्तींना संपर्क साधने आता सहज शक्य आहे. अनेक धक्कादायक माहिती समोर येईल पण देशाची संरक्षण विषयक गुप्त माहिती पाकिस्तानला मिळाली आहे. त्यामुळे देशाच्या संरक्षणालाच मोठा धोका निर्माण झाला आहे. त्यामुळेच हनी ट्रॅप मध्ये अडकून देशाशी गद्दारी करणाऱ्या रविकुमार वर्मा सारख्या गद्दारांना कठोर शिक्षा द्यायला हवी. ■ ■

बहुजन सौरभ

---

*तथागत गौतम बुद्ध हे सम्यक सम्बुद्ध होत. त्यांना सृष्टीतील सर्व प्रकारचे सुक्ष्मातिसुक्ष्म ज्ञान होते. या अर्थाने ते सर्वज्ञगामी होते. त्यांच्या आकलन शक्तिपासून काहीच सुटू शकले नाही. त्यांचे चित्त साऱ्या विषयासंबंधी तीक्ष्ण व द्रुतगामी तसेच परिपूर्ण व परिशुद्ध होते. त्यांनी कुठल्याही गुरुकडून उपसंपदा झाली नव्हती. बोधिवृक्षाखाली जे ज्ञान प्राप्त झाले तीच त्यांची उपसंपदा.*

# बुद्ध शासनातील अनित्यवाद

बोधिसत्वाच्या अवस्थेत असतांना प्राथमिक शिक्षण देणारे सब्बमित्त, शुन्यतेच्या सातव्या ज्ञानाचे मार्गदर्शक आलारकलाम आणि संवेदनशिलतेच्या आठव्या ज्ञानाचे प्रवक्ते उदयक रामपुत्र हे सारे ऐहिक ज्ञान देणारे आचार्य होत. परंतु लोकोत्तर धर्माचे शिक्षण देणारा बुद्धाचा कुणी गुरु नव्हता, जे कांही सर्वज्ञ या अर्थाने प्राप्त केले ते स्वप्रयत्नानी बुद्धगयेच्या सान्निध्यात होय. भिक्खूंना धम्म प्रचारासाठी ते म्हणत ‘देसतथ धम्म आदी कल्याणं, मज्झे कल्याणं, परियोसान कल्याणं, सार्थ व्यंजन केवल परिपुण्ण, परिशुद्ध ब्रम्हचरिय पकासेथ’ अर्थात ऊस जसा सुरुवातीला गोड, मध्ये गोड आणि अंती देखील गोड असतो. त्याप्रमाणे त्यांनी प्रकाशित केलेला धम्म परिपूर्ण, परिशुद्ध असून आदी कल्याणकारी, मध्यात कल्याणकारी व अंततः कल्याणकारी असून ब्रम्हचर्य प्रकाशित करणारा आहे.

बुद्ध दार्शनिकतेप्रमाणे सारे काही क्षणप्रतिक्षण बदलत आहे. नदीचा किनारा बदलतो आहे, प्रवाह बदलतो आहे तरीपण आपण त्याला नित्य मानतो. अशीच अवस्था शरीराची आहे-शरीर क्षणप्रतिक्षण जुने बाहेर टाकत असते व नवीन द्रव त्यात ओतत असते. तरी जड द्रनापासून बनलेल्या या शरीराला आपण नित्य समजतो हा एक भ्रम असून ते मिथ्याचरण होय. क्षणप्रतिक्षण होणाऱ्या परिवर्तनालाच अनित्यवाद, अनित्यदर्शन संबोधिले गेले. आप, तेज, वायू, पृथ्वी या चार धातूंच्या परस्पर संयोगाने निर्माण झालेली रूपकाय ही शारीरिक अवस्था परिवर्तनीय आहे. शरीर इंद्रिये नाक, कान, चक्षू, जिव्हा, त्वचा आणि चीत्त अशी ही सहा इंद्रिये आणि त्यांचे विषय अनुक्रमे गंध, शब्द रूप, रस, स्पर्श आणि त्या साऱ्या विषयाची अनुभूति घेणारे चित्त यातच सुख दुःखाची अनुभूति होते. मनुष्य जीवनात हे चार धातू आणि त्यांचे विषय यांच्या परस्पर संयोगाने उर्जेची निर्मिती होवून जीवनदोर सुरू होते. त्यामुळे जोपावेतो इंद्रिये आणि त्यांचे विषय याच्या परस्पर संयोगातून चित्ताला उर्जा मिळणे सुरु असते. तोपावेतो जीवनधारा सुरु असते. शरीर धातूच्या



कुठल्याही एक किंवा अधिक धातूत बिघाड झाल्याने अर्थात हे शरीर धातू असंतुलित झाल्याने चित्ताला मिळणारा उर्जेचा स्रोत बंद होणे म्हणजे मृत्यू होय.

शरीर भौतिक धातूचे असल्यामुळे त्याला भौतिक आहाराची गरज असते. त्याचप्रमाणे चित्ताला चैतसिक आहाराची गरज असते. आपण दैनंदीन जीवनात घेत असलेले भोजन आणि भौतिक वातावरण (थंड प्रदेश, उष्ण प्रदेश) हे भौतिक आहार होत. त्यानुसार फळभाज्या, पालेभाज्या या सात्विक आहाराचे भोजन शरीराला दिले तर भोजनाच्या गुणधर्माप्रमाणे सात्त्विक परमाणू शरीरावर उमटतील. मांसाहारी भोजन तसेच मादक पदार्थाचे सेवन केल्याने अग्नी धातप्रधान परमाणू शरीरावर प्रगटतील. मिर्च मसाले, स्निग्ध पदार्थ जेवणात असतील तर अग्नीप्रधान परमाणू प्रगरतील. शारीरिक आहारामुळे जलप्रधान, वायुपधान, अग्निप्रधान, पृथ्वीप्रधान परमाणू प्रगर होत असतात. शरीराला लागणाऱ्या भौतिक आहाराप्रमाणे चित्ताला चैतसिक आहार प्रिय असतात. क्रोध, भय, द्वेष, वासना, मोह, अहंकार हे सहा प्रकारचे षडरिपू चित्ताला आहार देत असतात. यातील कुठलाही आहार दिला तर त्या आहाराच्या गुणधर्मा-प्रमाणे परमाणू शरीरावर प्रगटतात. उदाहरणार्थ चित्ताला भयाचा आहार दिला तर वायूप्रधान परमाणू प्रगटतील. क्रोधाचा आहार दिला तर Shrivastava धातू? शरीरावर प्रगटतील. शरीर धातूचे पृथ्वी, आप, तेज, वायू हे चार स्कंध आणि त्यांचे गुणधर्म या समुहाला अष्टकलाप संबोधिले गेले. भौतिक जगतातील या सुक्ष्मातिसुक्ष्म कणाला कलाप म्हटले गेले. एक कलाप तयार होण्याकरिता चार धातू आणि त्याच्या चार प्राकृतिक गुणधर्मासोबत एकत्र येणे आवश्यक आहे. प्रत्येक धातूंचे गुणधर्म परस्परापासून भिन्न आहेत. पृथ्वी धातू त्याच्यात समाविष्ट असलेल्या हलकापण-भारीपण या गुणधर्मामुळे प्रसरण - आकुंचन शक्तीने बांधला आहे. वायू धातूच्या हलन - चलन या गुणधर्मामुळे संयोजन शक्तीने व्याप्त आहे. आप (जल) धातू प्रवाहित गुणधर्मामुळे संचालन शक्तीने प्रभावित आहे. अग्नीधातू उष्ण - ढंग या गुणधर्मामुळे संतापन शक्तीने व्याप्त आहे. हे चार धातू त्यांच्या प्राकृतिक गुणासोबत एकत्र येणे म्हणजे अष्टकलापाची निर्मिती होय. हे अष्टकलाप पूंज अविरत गतीने गतिमान असतात. त्यांच्यात उदय होणे, व्यय (नष्ट) होणे या प्रक्रियेमुळे संवेदनाची अनुभूति होते. वरपांगी ठोस वाटणारी प्रत्येक वस्तू तरंगाचा समूह आहे. त्याप्रमाणे मानवी शरीर हे ठोस नसून तरंगाचा समूह होय. भगवान बुद्धांनी साक्षात अनुभवले की कलाप प्रतिक्षण अगणितवेळा परिवर्तित होतात. भगवान बुद्ध म्हणतात, एक कलाप बनतो तो वस्तूतील आठ गुणधर्माच्या संयोगाने होय. त्याला भगवंतानी अष्टकलाप नाव दिले. कलाप परमाणुपेक्षाही सुक्ष्म असतात - पुढे त्याचे तुकडे तुकडे करता येत नाही. प्रत्येक कलाप उत्पन्न होतो व नष्ट होतो. म्हणून बुद्ध याला ‘उपज्झित्वा विरुझंति’ म्हणतात. भौतिक जगताचे सुस्मातिसुक्ष्म कण कलाप होत. त्यांच्या स्वभावधर्माचा आणि गतिशिलतेच्या अभ्यासातून भौतिक वैज्ञानिकांनी केलेली प्रगती ही बुद्धाच्या अनित्यवादाची देण होय. विज्ञान शास्त्रज्ञांनी यालाच अलिकडे अणुशक्ती नाव दिले. कलापाची ही शक्ती मानवी संवर्धन अथवा विनाशाकडे नेणारी आहे. भगवान बुद्धानी कलापाची साक्षात अनुभूति घेवून मानवजातीला विज्ञानाच्या या क्षेत्रात नवी दिशा दिली त्या अर्थाने ने श्रेष्ठ वैज्ञानिक होत.

भगवान बुद्ध म्हणतात जे काही अस्तित्वात आहे त्याला कारण आहे. कारणाशिवाय परिणाम होवू शकत नाही. हेतू (कारण) आहे त्यामुळे प्रत्यय (परिणाम) आहे. त्यामुळे कुठल्याही वस्तूची उत्पती ही ईश्वरनिर्मित नसून त्यात समाविष्ठ असलेल्या गुणधर्माचा परिणाम आहे. त्यामुळे आमचे कर्म हे भल्यावाईट परिणामाचे कारण आहे. साऱ्या वस्तूंची उत्पत्ती सहेतुक (कारणासहित) आहे. म्हणून कुशल कर्म करा परिणाम कुशल येतील. अकुशल कर्म केल्यास अमंगलच होईल. बुद्धाचा धम्म हा विवेक पथ असल्यामुळे अंधविश्वास, अंधश्रद्धा, रुढीवादिता याविरुद्ध बुद्धीवादाला प्रोत्साहित केले आहे. त्यामुळे देवळात जाणे व नतमस्तक होवून पुजाऱ्याला दान देणे व स्वतःच्या मुक्तीचा भार इतरावर लादणे हा बुद्ध शिकवणुकीचा मार्ग नसून आचरणाचा जीवनमार्ग आहे. ‘त्यामुळे तुमचा कुणी मुक्ती दाता नसून भगवान बुद्ध हे मार्गदाता आहेत. ‘अत्त दीप भव’ हा मुक्तीचा मार्ग आहे. ■ ■

अॅड. मदन उ. उके
मो. 9923282528

---



# मोबाईलने हिरावले बालपण

आपण म्हणतो बालपण देगा देवा! परंतु आज आपले बालपण मोबाईल हिरावून घेत आहे ही अत्यंत चिंताजनक बाब आहे. स्मार्टफोन दिवसेंदिवस छोट्या-छोट्या बालकांसाठी व युवावर्गासाठी घातक सिद्ध होत. त्याचप्रमाणे शाळांमध्ये सुद्धा विद्यार्थीवर्ग मोबाईलचा मोठ्या प्रमाणात वापर करीत आहे व यांचे दुष्परिणाम हळूहळू सामोर येतांना दिसत आहे. एक वर्षांवरील मुले रडतात म्हणून आई-वडील मुलांच्या हातात मोबाईल देवुन आपली सुटका करून घेतात. याचेही दुष्परिणाम हळूहळू समोर येतांना दिसत आहे. ही परिस्थिती फक्त भारतातच नाही तर संपूर्ण जगात आपल्याला पहायला मिळते. यामुळे जगातील संपूर्ण शाळांनी मोबाईलवर बंदी आणावी असा सुचक सल्ला युनेस्कोने दिला आहे. देशासह जगात डिजिटल क्रांती झाली अवश्य परंतु त्याचा गैरवापर विद्यार्थ्यांच्या व युवकांच्या अंगाशी येतांना दिसत आहे. सोबतच बालवयात आई-वडील मुलांना मोबाइलच्या आहारी टाकतांना दिसतात. स्मार्टफोनमुळे सामाजिक, व्यवहारीक व इतर क्षेत्रात आमूलाग्र बदल झाल्याचे आपल्याला दिसुन येते. आज मोबाईलच्या अतिवापरामुळे कोणीही कोणासोबत समक्ष बोलायला तयार नाही, घरात सर्वसाधारण चर्चा करायला तयार नाही, कोणत्याही गोष्टीची बोलण्यातून देवाणघेवाण किंवा आदानप्रदान होत नाही. कारण एक वर्षाच्या मुलांपासून ते मोठ्यापर्यंत सर्वच घंटो-न-घंटे मोबाईलमध्ये व्यस्त असतात. पालक आपल्या जबाबदारीपासुन पळ काढण्यासाठी व अति लाडामुळे चिमुकले सुद्धा मोबाईलच्या आहारी गेले आहेत. यामुळे मानसिक आजार वाढण्याची दाट शक्यता आहे आणि वाढत आहे. मोबाईलच्या गेममध्ये युवावर्ग दिवसेंदिवस फसतांना दिसत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे भारतात युवावर्ग मोठ्या प्रमाणात मोबाईलच्या आदिन झालेले आहेत. यामुळे त्यांना अनेक व्याधींचा सामना करावा लागतो आहे. शिक्षण क्षेत्रातील डिजिटल क्रांती विद्यार्थांसाठी चिंताजनक असल्याचे मत युनेस्कोच्या अहवालातून समोर आले आहे. मोबाईलचा अतिरिक्त वापर झाल्याने शैक्षणिक कामगिरी मंदावते. स्क्रीन टाईम वाढल्याने मुलांच्या भावनिक स्थिरतेवर नकारात्मक परिणाम होतो. परिणामी, मुले चिडचिडे व रागीट बनतात असेही युनेस्कोने म्हटले आहे. यामुळे मुलांमधील फिजिकल एक्टिविटी दिवसेंदिवस मोठ्या प्रमाणात कमी होतांना दिसत आहे. हा अत्यंत चिंतेचा आणि गंभीर विषय आहे.

देशात 74 टक्के मुले (11 ते 17 वयोगटातील) रोज 30 मिनीटेही मैदानी खेळ खेळत नाही. त्याचप्रमाणे 16 ते 34 वयोगटातील 59 टक्के लोक ऑनलाईन खेळ 3-3 तास खेळण्यात मग्न असतात. म्हणजेच आजची युवा पिढी मोबाईलच्या खेळांमध्ये (गेममध्ये) किंवा सिरीयल पहाण्यात मोठ्या प्रमाणात मग्न असल्याचे स्पष्ट दिसून येते. यामुळे शरीराला आवश्यकतेनुसार पाहिजे तेवढा व्यायाम मिळत नाही. डब्लुएचओच्या रिपोर्टनुसार भारतात 11 ते 17 वयोगटातील 74 टक्के मुले फिजीकल एक्टिव्ह नसल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच एका आठवड्यात मुले 150 मिनिटसुद्धा खेळत नाही किंवा शारीरिक हालचाली ज्या पद्धतीने पाहिजेत त्या पद्धतीने दिसून येत नाही. यावरून स्पष्ट होते की आजचा विद्यार्थीवर्ग व युवावर्ग दिवसेंदिवस डोक्यानी कीतीही हुशार असेल परंतु शारीरिक दृष्ट्या दिवसेंदिवस खालावत असल्याचे दिसून येते. देशातील 41 टक्के लोक मोबाईलच्या नादामुळे शारीरिक व्यायामाच्या दृष्टीकोनातून एक्टिव नसल्याचे दिसून येते. म्हणजे आज बालपणापासुन तर युवा वर्गापर्यंत आणि युवावर्गापासुन तर वयस्कर लोकांना सुद्धा मोबाईलने चांगलेच जखडल्याचे आपण पहातो. यामुळे शरिराला ज्या पद्धतीने आणि ज्याप्रमाणात व्यायामाची आवश्यकता आणि गरज आहे तो मिळत नसल्याने अनेक व्याधी किंवा आजार बालकांमध्ये, युवावर्गामध्ये व अन्य लोकांमध्ये दिसून येते व यांचा परिणाम आरोग्यावर मोठ्या प्रमाणात विपरीत परिणाम होत आहे. आज भारतातच नाही. तर संपूर्ण जगात मोबाईलशिवाय जिवन अधुरे असल्याचे सर्वांना वाटते. परंतु मोबाईलचा वापर दिवसेंदिवस मानवाच्या दृष्टीकोनातून अत्यंत घातक सिद्ध होत आहे हेही तितकेच सत्य आहे. याला कोणीही नाकारू शकत नाही. म्हणजेच मोबाईलचा अती वापर जीव घेणा सीद्ध होवू शकते. यालाही नाकारता येत नाही. मानवाच्या मेंदूला (मस्तिष्कला) रक्तपुरवठा व्यवस्थित आणि सुरळीत झाला नाही तर (स्ट्रोक)होण्याचे मोठे कारण ठरू शकते. स्ट्रोक म्हणजे पॅरालिसीसचा अटॅक अथवा लकवा किंवा ब्रेन अटॅक असेही म्हणतात. देशात स्ट्रोकच्या आजाराचे जवळपास 65 लाख रूग्ण असल्याचे सांगितले जाते. म्हणजेच आजच्या घडीला मोबाईलच्या अती वापरामुळे मानवजाती अत्यंत धोकादायक स्थितीत आल्याचे समजते. ही बाब स्पष्ट होते की मोबाईलच्या अती वापरामुळे लठ्ठपणा, शुगर (मधुमेह), डोळ्यांचा आजार, मानेचा त्रास, मानसिक त्रास, हार्टच्या आजारासह अनेक आजार मानवाच्या शरिरात घर करीत आहे. याचे मुख्य कारण म्हणजे शरीरातील अवयवांना पाहिजे त्याप्रमाणात व्यायाम मिळतच नाही. त्यामुळे ही कठीण परिस्थिती उद्भवत आहे. मानवाला मोबाईलमुळे जेवढा आनंद मिळतो त्यापेक्षा जास्त धोका मोबाईलमुळे होणाऱ्या आजारामुळे निर्माण होत आहे. त्यामुळे मोबाईलचा वापर कमीत कमी कसा करता येईल व आपल्याला शारीरिक दृष्ट्या कोणताही धोका निर्माण होणार नाही. या पद्धतीने मोबाईलचा वापर व्हायला हवा. ‘अमेरिकन ॲकेडमी ऑफ पीडियाट्रिक्स’ या संस्थेने एका संशोधनात म्हटले आहे की दोन ते चार वर्षांच्या मुलांनी दिवसातून फार तर एक तास फोन वापरणे योग्य असल्याचे संशोधनात म्हटले आहे. चार वर्षांपेक्षा जास्त वयाच्या मुलांनी दररोज दोन तास मोबाईल वापरणे योग्य आहे. यापेक्षा जास्त मोबाईल वापरल्यास डोळ्यासोबतच मानसिक आरोग्यावरही विपरीत परिणाम होतो. यानंतर यांचे भयंकर परिणाम भोगावे लागू शकतात. आपण काय करायचे आणि काय करू नये हे आपणच ठरवू शकतो व धोकादायक वस्तूपासून दुर राहु शकतो. आज आपण पहातो 3 ते 20 वर्षे वयोगटातील मुले-मुली टीव्ही पहाताना, जेवतांना मोबाईलला चिपकून रहातात. जणू काय मोबाईल बीना जिवन अधुरे आहे की काय अशी परिस्थिती दिसून येते. याचा दुष्परिणाम पुढे चालुन भयानक होवू शकतो. छोटे मुलं रडायला लागले की आई-वडिल त्यांच्या हातात मोबाईल देऊन मोकळे होतात. परंतु हे घातक आहे. त्यामुळे पालकांना आग्रहाची विनंती करतो की मुलांना मोबाईल पासून जितके दुर ठेवता येईल तितके दुर ठेवलेच पाहिजे. यामुळे मुलांना फिजिकल ॲक्टीव्हीटी किंवा व्यायाम करण्यास मदत होईल. मोबाईलचा अती वापर शरिराला घातक आहेच. त्याचबरोबर त्याचा गैरवापर केला तर जीवाला सुद्धा धोका निर्माण होऊ शकतो आणि होत आहे. आजही लोक वाहन चालवितांना मोबाईलवर बोलत राहतात. यामुळे अनेक दुर्घटना झाल्याचे आपण पहातो आणि यामुळे देशात मोठ्या प्रमाणात जीवीत हानी सुद्धा झाल्या आहेत. मोबाइल वापरायला हरकत नाही. परंतु त्याचा योग्यवेळी आणि कमीत कमी वापर व्हायला पाहिजे. अन्याथा मोबाईलमुळे जेवढे सुख आणि आनंद मिळतो. त्यापेक्षा हजारो पटीने आपल्याला यातना किंवा दुःख भोगाव्या लागतील हेही तितकेच सत्य आहे. त्यामुळे मुलांनी मोबाईल हातात घेण्यापेक्षा पुस्तक, वर्तमानपत्र हातात घेतले तर बद्धीचा विकास झपाट्याने होईल व पुस्तकी ज्ञानामुळे शरिराच्या विकासाला मोठी चालना मिळेल. आपण एकंदरीत विचार केला तर मोबाईल युगामुळे देशातील मातीतील छोटे-छोटे खेळ नामशेष झाले किंवा होण्याच्या मार्गावर आहेत. त्यामुळे अनेक आजारांचा सामना करावा लागतो आहे. आजच्या युवापिढीला जुने खेळ काय होते ते सुद्धा माहिती नाही आणि या संपूर्ण गोष्टी मोबाईलमुळे उद्भवतांना दिसते. म्हणजेच आजचे मोबाईल युग बालकांसाठी, युवा वर्गासाठी किंवा विद्यार्थ्यांना शारीरीक दृष्ट्या अपंग करीत असल्याचे दिसून येते. यावरून असे लक्षात येते की वर्चुअल खेळांमुळे रियल खेळ हळूहळू नामशेष होण्याच्या मार्गावर आहेत. आज मोबाईलची दुनिया पहाता असे वाटते ‘कहा गये ओ दिन.’ ■ ■



रमेश लांजेवार
मो. 9921690779

---





बहुजन मानस

नागेश चौधरी (बहुजन विचारवंत)
9970873560

# भारत : एक संघराज्य की राज्यांचा संघ !

राज्ये आणि स्थानिक स्वराज्य संस्थांना दुर्बल करण्याच्या हेतूने स्वतःकडे अधिकार केंद्रित करण्याच्या प्रवृत्तीचा मी केंद्र सरकारवर स्पष्टपणे आरोप करतो, जे ब्रिटीशांनीही केले नव्हते. राज्ये त्यांच्या नागरिकांच्या कल्याणासाठी जबाबदार आहेत आणि सक्रिय प्रयत्न करत आहेत. केंद्रशासनातील राज्यकर्ते राज्यांना दुर्बल करण्यात धन्यता मानत असतील तर हा विश्वासघात नाही का? त्यांच्याकडून सूड उगवण्याची ही कृती नाही का?

*१९१९ च्या गव्हर्नमेंट ॲफ इंडिया ॲक्टमध्येही प्रांतामध्ये स्वशासन असले पाहिजे ज्यामध्ये स्थानिक आणि प्रांताचे हित जपले जाईल असे म्हटले होते.*

कर, महसूल, जीएसटी - भाजप सत्तेवर आल्यानंतर त्याने वस्तू आणि सेवा कर (जीएसटी) लागू केला जो राज्याच्या आर्थिक अधिकारांचे उल्लंघन करतो आणि वंचित करतो. त्यांनी कराचा महसूल लुटला आहे. त्यांनी भरपाईचे आश्वासन दिले असले तरी नुकसान भरपाईचे वितरण पूर्ण झालेले नाही. राज्य सरकारसाठी असलेला निधीही ते सोडत नाहीत. आतापर्यंत, तामिळनाडूला 211,000 कोटी रुपये मिळालेले नाहीत. नियोजन आयोग हे असे स्थान होते जिथे राज्ये या रास्त मागण्या मांडू शकतात. त्यांनी ही संस्थाही मोडीत काढली. नियोजन आयोग ही अशी जागा होती जिथे राज्ये आपल्या मागण्या मांडू शकत होत्या. दक्षिण भारतात रेल्वे योजनांना निधी दिला जात नाही. कोणतेही वादविवाद होऊ नयेत, म्हणून रेल्वे अर्थसंकल्पच रद्द करण्यात आला. शेती कायदे, ज्यांना राज्यघटनेच्या राज्यांच्या यादीत स्थान आहे. ते राज्य यादीतून काढण्यात येत आहे. सर्व कायदे आता कोणत्याही वादविवादाविना पारीत केले जातात. संसद आता चर्चा, वादविवादापासून वंचित आहे आणि उपस्थित केलेल्या कोणत्याही प्रश्नांची उत्तरे देण्यात येत नाहीत.



आज जे अधिकारांचे केंद्रीकरण होत आहे तसे इंग्रज शासनकाळात देखील नव्हते. आपल्या संविधानकारांनी देखील केंद्राला एवढे अधिकार दिले नाहीत. याचा अर्थ अधिकारांचे जेवढे केंद्रीकरण संविधानात नाही त्यापेक्षा कितीतरी जास्त अधिकार आज केंद्र सरकार आपल्या कवेत घेत आहे आणि अशा प्रकारे हे सरकार राज्यांना पूर्णपणे आपल्या अधिकारात आणत आहे आणि संविधानाची मोडतोड करून संपूर्ण देश आपल्या टाचेखाली कसा राहील यासाठी हे सर्व सुरु आहे. रा.स्व.संघाची किंवा गोळवलकरांनी एकसंघ युनिटरी संविधानाची जी भूमिका मांडली होती त्याची ही प्रत्यक्ष अंमलबजावणी कडे वाटचाल आहे.

मुख्यमंत्री स्टॅलिन प्रमाणे विभिन्न राज्यांनी आवाज उठवण्याची गरज आहे आणि दुसरे म्हणजे यामुळे इथल्या बहुसंख्य लोकांचे साऱ्या समस्या, साऱ्या मागण्या या हिंदू राष्ट्रवाद्यांना कराव्या लागतील. म्हणजे रा.स्व.संघ मालकाच्या भूमिकेत असेल. एकसंघ देश म्हणजे इथल्या सामाजिक रचनेत ज्यांचे वर्चस्व आहे त्यांच्या हुकुमावरून चालणारा देश, चालणारी सत्ता!

अर्थात, ब्राह्मणी सत्ता, व्यवस्था. ■ ■

---

# बुध्दीभेदाची कार्यशाळा राष्ट्रीय स्वयंसेवक संघ




डॉ. बाबासाहेबांचे विधान वाचल्यानंतर आपल्या डोळ्यासमोर बाबासाहेबांनी कोणत्या कडकडीने हे विधान म्हटले आहे हे आपल्या लक्षात येते. मूळात हिंदूराष्ट्र म्हटले की चातुर्वर्ण्य आणि जातींची उतरण. मुळात भारतीय संविधानाच्या माध्यमातून हेच तर नष्ट झाले आहे आणि परत जर हिंदूराष्ट्राचे दिवास्वप्न रा. स्व. संघ बघत असेल तर देशाला कुठल्या खाईत हे लोक घेऊन जाऊ इच्छितात हे आपल्या लक्षात येते. या पुस्तकामधील ‘संघाचे बदलते वारे’, ‘विद्यापीठ इतिहास शिकवणार की घडवणार?’, ‘संस्कृत भाषेचा आग्रह कशासाठी आणि कुणासाठी?’, ‘हिंदूंना बदनाम करणारे आहेत तरी कोण?’, ‘गुन्हेगार ठरवण्यासाठी पुस्तकांचा आधार निराधार’, ‘विनायक दामोदर सावरकरांना नक्की कोण बदनाम करतयं?’, ‘राष्ट्रीय स्वयंसेवक संघ मुस्लिमांप्रती द्वेषभावना बाळगत नाही?’, ‘सरसंघचालक मोहन भागवतांचे वक्तव्य, एका दगडात अनेक पक्षी मारण्याची कला!’, ‘आंबेडकर, हेडगेवार - विचार व कृतीतील तफावत’ इत्यादी लेख रा. स्व. संघाची कथनी आणि करणी उघड करणारे आहेत. ‘नथुराम गोडसे द्वेषाचा प्रचारक’, ‘गुरूजींचा खोटारडेपणा’, ‘मोठी फसवणूक - हेडगेवार स्वातंत्र्य लढा आणि नेताजी बोस’, ‘नेहरूंनी संघाला 26 जानेवारीच्या संचलनासाठी दिलेल्या आमंत्रणाचे सत्य’, ‘माजी स्वयंसेवकांच्या नजरेतून ‘संघ’ इत्यादी लेख धीरेंद्र कुमार यांच्या इंग्रजी लेखांचा मराठी अनुवाद लेखक अमित इंदूरकर यांनी करून राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचा खोटारडेपणा उघड केला आहे.

आर. एस. एस. ला ओळखा या पुस्तकात शम्सुल इस्लाम यांनी म्हटले आहे, ‘या देशात कोण निष्ठावान आहे आणि कोण नाही याचे प्रमाणपत्र देण्याचा ठेका सुध्दा संघानेच घेतला आहे. मात्र रा. स्व. संघ ही अशी संघटना आहे जी स्वतंत्र भारताचे संविधान, तिरंगा राष्ट्रध्वज आणि लोकशाही व धर्मनिरपेक्षता यांसारख्या राष्ट्रीय संकल्पनांवर तर विश्वास ठेवतच नाही पण भारताच्या स्वातंत्र्यलढ्यात ही तिचे काहीच योगदान नव्हते. लालकृष्ण अडवाणींनी तर रा. स्व. संघाला भाजपची ‘नाळ’ म्हणून संबोधले आहे. त्यांच्या म्हणण्याचा स्पष्ट अर्थ आहे की जशी आई तिच्या गर्भाशयातल्या बाळाच्या पोषणासाठी नाळेद्वारे अन्न पुरवते त्याचप्रमाणे रा. स्व. संघ हा भाजपला आवश्यक तो सर्व खुराक उपलब्ध करून देतो. त्यामुळे रा. स्व. संघाने पांघरलेले ‘अराजकीय’ संघटनेचे सोंग आता गळून पडलेय. या देशाला धर्माधिष्ठित राष्ट्रात परिवर्तित करण्याच्या कामात संघ गुतलेला आहे. या आंतरिक धोक्याबद्दल जर आपण वेळीच जागे नाही झाले तर या देशाचा विध्वंस होण्यापासून कोणीही वाचवू शकणार नाही.

लेखक हे पुस्तक वैचारिक विचारधनाचे हस्तांतरण करणाऱ्या गुरूवर्य मा. पुरूषोत्तम भिसीकर व फॅसिस्ट शक्तींविरोधात लढा देणाऱ्या संपूर्ण जगातील लेखक, संशोधक, पत्रकार व कार्यकर्त्यांना अर्पण करतात. बुध्दीभेदाची कार्यशाळा ही संकल्पना आपल्याला सावध करते अशा शक्तींविरोधात ज्या लोकांमध्ये दुजाभाव, द्वेष आणि फुट पाडण्यासाठी पध्दतशीर काम करतात. अशा कार्यशाळा ओळखणे आणि त्यांच्यापासून सजग राहणे हीच खरी सामाजिक जबाबदारी आहे. विचारांची लढाई विचारांनीच जिंकली पाहिजे म्हणून देशातील तमाम बुध्दीजीवी, विवेकवादी आणि ज्यांची चांगले काय आणि वाईट काय हे समजून घेण्याची बुध्दी शाबुत आहे अशा तमाम वाचकांनी हे पुस्तक आवर्जून वाचावे ही या अनुषंगाने आपणास कळकळीची विनंती.

लेखक - अमित इंदूरकर
मो. 7262915254
पुस्तकमुल्य-150 रूपये. ■ ■

समीक्षा



सरिता सातारडे
मो. 8308853051

# सुनबाई इज्जतीची कोरडी भाकरी जास्त चांगली असते ग...

## बेईज्जतीच्या पक्वानांपेक्षा....

*‘बाबा, जे काही मी बनवलेय ते शांतपणे खाऊन टाका. रोजच्या रोज तुमचे नखरे सहन करायला मी इथे बसलेली नाहीये..’ कविता बडबडतच खोलीतून बाहेर निघून गेली. सकाळच्या नाश्त्याची वेळ होती आणि कविताने थोडीशी करपलेली, कडक पोळी आणि कोरडी भाजी वाढली होती.*

कमलेशजींनी फक्त एवढेच म्हटले होते, ‘सूनबाई, या वयात दात साथ देत नाहीत ग, थोडी मऊ पोळी द्यावी ना किंवा दूध द्यावे, त्यात भिजवून खाईन ना ग.’ हे रोजचेच झाले होते. ताटात खाण्यायोग्य जेवण क्वचितच असायचे. बनावट दात होते आणि पचनसंस्थाही कमजोर झालेली होती, त्यामुळे जर कधी खिचडी, उपमा किंवा काही मऊ पदार्थ मिळाला असता, तर जरा चवही बदलली असती आणि पचनातही आराम मिळाला असता. पण त्यांचे जेवण जणू कुठल्या मुक्या प्राण्यापुढे अन्न टाकल्यासारखे वाढले जायचे. करणार तरी काय? कमलेशजींनी मुलाच्या आग्रहाखातर गावातले घर विकून टाकले होते आणि त्याच पैशातून शहरातले हे घर घेतले होते. संध्याकाळी फिरायला गेले की पार्कमध्ये त्यांचे काही मित्र भेटायचे, जरा गप्पाटप्पा व्हायच्या. वृद्धत्वातील सुखद आठवणी आणि काळज्या यांचा खेळ चालूच असायचा.



सागर रामभाऊ तायडे
9920403859

आज कमलेशजी थोडे उदास वाटत होते. रंजन बाबूंनी ते ओळखले आणि विचारले, पण कमलेशजींनी तब्येतीचे कारण दिले. घरातल्या गोष्टी सार्वजनिक करणे म्हणजे स्वतःच्याच घराची बदनामी होती. कोण काय बोलेल, कोण कसे समजून घेईल, याचे काही सांगता येत नव्हते. त्यांच्या मनात विचार आला ‘आपल्या संस्कारांवरच प्रश्न उभा राहील... आपण आपल्या मुलांना कसे वाढवले? की ज्यांना आपल्या बापाचीच काळजी नाही!’ औषधे, जेवण सगळे काही त्यांच्याच कृपेवर चाललेले आहे की..असा विचार करत करतच संध्याकाळी लवकरच ते घरी परतले. रात्री जेवताना मुलाशी काही बोलायचे ठरवले होते, पण कविताने मध्येच बोलत म्हटले, ‘बाबा, त्यांना तरी शांततेने जेवू द्या. दिवसभर काम करतात ते.’ कमलेशजींनी काही न बोलता डोळ्यांत पाणी आणून जेवण केले आणि आपल्या खोलीत गेले. त्यांच्या मनात जुन्या आठवणी दाटून आल्या. ललिता तिच्या हाताने गरम गरम पोळ्या करत असे. प्रत्येकाच्या आवडीनिवडी लक्षात घेऊन स्वयंपाक करत असे. या सुनेला ज्याचे नखरे वाटतात, त्याच मुलासाठी ललिता स्वतःच्या तब्येतीचा विचार न करता त्याच्या आवडीची दुसरी भाजीपण करत असे. त्या रात्री त्यांना वाटले, जणू ललिता त्यांच्याशी बोलत आहे, ‘तुम्ही गावाला परत जा ओ... रामू (नोकर) तुम्हाला जास्त चांगले सांभाळेल.’ ते विचारात पडले. रोज-रोजची ही अपमानाची थाळी खाण्यापेक्षा मृत्यूच चांगला. सकाळ झाली तसे त्यांनी ठामपणे ठरवले, ‘जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत सन्मानाने जगावे.’ नाश्ता आला, त्यांनी थाळी डोक्याला लावली आणि म्हणाले, ‘सूनबाई, हे अन्न परत घेऊन जा.’ कविताने तुच्छतेने विचारले, ‘काय झाले? आधी सांगितले असते भूक नाहीये तर, उगाच अन्नाची नासाडी नसती ना झाली.’



कमलेशजी म्हणाले, ‘सुनबाई इज्जतीची कोरडी भाकरी जास्त चांगली असते ग, बेईज्जतीच्या पक्वानांपेक्षा. मी इथून निघून जायचे ठरवलेय. गावाकडे परततोय. जिवंत राहण्याइतका पैसा आहे आणि जगणे शिल्लक आहे. आज सायंकाळचीच गाडी पकडतोय.’ कविताचा थरकाप उडाला. जर रवी (पती) ला हे कळले, तर तो तिच्यावर नक्कीच रागावेल. कमलेशजी समजूतदार होते, त्यांनी रवीला फक्त एवढेच सांगितले, ‘बेटा, शेताचे काही काम आहे, म्हणून जातोय आणि एक गोष्ट लक्षात ठेव, नोकरीसोबत वडिलांसाठी वेळ काढणेही तितकेच महत्त्वाचे असते बेटा.’

रवी चिंतेत पडला. बाबा अचानक का जात आहेत? दिवसभर त्याचे मन कामात लागले नाही. त्याने दुसऱ्या दिवशी गावाला जायचे ठरवले. रात्री घरी येऊन त्याने कविताला सांगितले, ‘मी काही दिवस ऑफिसच्या कामासाठी जातोय.’ कविता लगेच म्हणाली, ‘मग मला पण घेऊन चल, जरा आउटिंग होईल. बाबांनी मला नुसते बांधून टाकले होते इथे त्यांची सेवा करण्यासाठी. आता सुटले एकदाची बंधनातून.’ रवी बोलला, ‘बंधन...? बाबांच्या उपस्थितीत काय बंधन होते? खरे सांग, बाबांनी घर का सोडले?’ कविता चिडून म्हणाली, ‘मी कंटाळले होते त्यांच्या नखऱ्यांना. काल तर जेवण सुद्धा परत केले.’ रवीला सगळे समजले. तो म्हणाला, ‘तू एकदा तरी फोन करून सांगायचे होतेस ना की बाबा काहीही न खाता घर सोडून गेलेत. मी उद्या गावाला जातोय. बाबांनी मला काहीच संगीतले नाही, पण मी त्यांचे मन नक्की जाणून घेईन.’ कविताला पश्चात्ताप झाला. ती म्हणाली, ‘चूक माझी आहे, मीच सुधारेल. मीही येईन बाबांना परत आणायला.’ दुसऱ्या दिवशी दोघेही गावाला पोहोचले. तेव्हा कमलेशजी शेत विकण्याची तयारी करत होते. कविता त्यांच्या पायावर पडून रडत माफी मागू लागली. रवीही माफी मागू लागला. कमलेशजी म्हणाले, ‘बेटा, म्हातारपणात काय लागतय माणसाला? फक्त इज्जतीची भाकरी!! तुमच्या घरात ती पण मिळत नव्हती. म्हणून मी आता ठरवलेय की मी आश्रमात जाईन आणि माझ्या नातवंडांच्या नावावर पैसा ठेवीन. जेणेकरून त्यांना अशी वागणूक मिळणार नाही.’ रवी म्हणाला, ‘मला काही नको, पण कृपया एक संधी द्या. मी वचन देतो, तुमच्या सन्मानात कधीही कमी पडू देणार नाही.’ खूप विनवण्या करून रवी आणि कविताने त्यांना परत घरी आणले. सर्वांनी परत एकत्र राहायला सुरुवात केली. कविता आता कमलेशजींच्या सन्मानात कधीच कमी पाडत नाही. रवीलाही वडिलांसोबत वेळ घालवायची सवय लागली. हे खरे आहे, ‘जसे कर्म तसेच फळ’. जे आज आपण आपल्या आई वडिलांशी वागतो, उद्या आपल्यावर परत तीच वेळ येणार. ■ ■

## त्या स्पर्श

### अनंतायन



ॲड. अनंत खेळकर
मो. 9370061677

दोघी मैत्रिणी समुद्र-किनारी वाळूवर निवांत बसल्या होत्या. हवेच्या थंडगार झुळुकींचा स्पर्श मनाला प्रसन्न करीत होता. समुद्राच्या लाटा हळुवारपणे पायांना स्पर्श करीत असतानाच एका मैत्रिणीचे अचानक डोळे भरून आले. तेव्हा दुसरी मैत्रीण म्हणाली, ‘काय झाले?’ पहिली म्हणाली, ‘काहीही नाही.’ ‘काहीही नाही तर मग डोळ्यांत अश्रू का आले?’ अश्रू पुसत ती म्हणाली, ‘आयुष्यात काही जुन्या आठवणी पिच्छा सोडत नाहीत. जेवढा विसरायचा प्रयत्न केला तेवढ्या त्या पुन्हा पुन्हा डोके वर काढतात.’ ‘काही सांगशील की नाही? कसल्या आठवणी?’ ‘सुंदर, सालस, सुशिक्षीत म्हणून एका तरूणाशी माझे लग्न झाले.’ ‘बरं मग?’ ‘लग्नानंतर काही दिवसातच त्याचे खरे रूप कळले. माहेराहून पैसे आण म्हणून छळ होऊ लागला. नंतर कळले याचे माझ्याशी लग्न होण्याआधी दोन विवाह झाले होते. एकीचा याने खून केला, तर दुसरीने याच्या जाचाला कंटाळून आत्महत्या केली.’ ‘बापरे! काय भयंकर आहे हे. मग तू काय केले?’ ‘मी घटस्फोट घेतला.’ ‘बरे केले.’ ‘पण प्रश्न घटस्फोटाने सुटतो का? आपल्याला फसवल्या गेल्याची सल कायम काळजाला बोचत राहते.’ ‘तुझे म्हणणे एकदम बरोबर आहे. पण आता या वेळी ते सर्व कसे काय आठवले?’ आपला हुंदका आवरत ती म्हणाली, ‘देखण्या राजबिंड्या देहात प्रत्यक्ष सैतान दडलेला आहे. याची कल्पना त्या व्यक्तीकडे बघून येत नाही.’ ‘हो! समाजात अशी कितीतरी उदाहरणे आहेत.’ ‘तू म्हणाली, ना, हे आता का आठवले? आज वाऱ्याची मंद झुळूक अन् लाटांच्या पायाला होणाऱ्या हळुवार स्पर्शामुळे माझ्या त्या कटू स्मृती उफाळून आल्या.’ ‘त्या कशा काय?’ ‘या हळुवार पणे येणाऱ्या लाटांकडे बघून कुणालाचाही विश्वास बसणार नाही की, याच त्या लाटा आहेत, ज्यांनी मोठमोठी जहाजे बुडवली.’ ‘हो! हे ही खरेच आहे.’ ‘तुला आठवते? काल आपल्या येथे जोराचे वादळ आले होते. त्यामध्ये आमच्या अंगणातील एक झाड उन्मळून पडले. पाखरांनी एक एक काडी आणून मेहनतीने बनवलेल्या कितीतरी घरट्यांचा अक्षरशः चुराडा झाला. काही पक्षी मृत्युमुखी पडले. एक झाड काय तुटून पडले. त्याच्या पडण्याने शेकडो पाखरे बेघर झाली.’ ‘बिचारे मुके जीव! अगोदरच त्यांना या सिमेंटच्या जंगलात निवारा मिळणे कठीण झाले. त्यात ही नियतीने केलेली क्रूर थट्टा.’ ‘तेच म्हणायचे मला. माझ्याही आयुष्याचे तसेच झाले. त्याच्या रूपात सुरुवातीला मला या हवेच्या झुळुकीसारखे वाटले. पण हीच हवेची झुळूक एक दिवस वादळाचे उग्र रूप धारण करून आपल्या आयुष्याच्या वृक्षाला मुळासकट उखडून टाकेल, असा विचारही कधी मनाला शिवला नाही.’ ‘खरेच खूप वाईट झाले गं बाई तुझ्या सोबत!’ ही हवेची झुळूक जणू मला एका अज्ञात शायराच्या या ओळी ऐकवत होती. ‘दिल पे जो गुजरी वो अनजान क्या जाने प्यार किसे कहते है? वो नादान क्या जाने हवा के साथ उड गया घर उस परिंदे का कैसे बना था घोसला वो तुफान क्या जानेऽ’ दोघींच्याही मुखातून शब्द फुटत नव्हता. डोळ्यांतून अश्रूंच्या धारा वाहत होत्या, अजूनही वारा वाहत होता. अन् लाटासुद्धा हळुवारपणे पायांना स्पर्श करीत होत्या. पण हे दोन्हीही स्पर्श दोघींच्याही मनात जणू दहशत पसरवत होते.. ■ ■

# तंबाखुच्या व्यसनाला हवी वेसन !

31 मे तंबाखूविरोधी दिन साजरा करत असतांना अतिशय खेद होतो की, तंबाखू दिन दररोज साजरा केला जातो. तर तंबाखुविरोधी दिन हा वर्षातून एक दिवससुद्धा पूर्णपणे तंबाखूविरोधी दिन नसतो हीच खरी चिंतेची बाब आहे. भारत ही जगातील चौथ्या क्रमांकाची अर्थसत्ता बनत असताना मधुमेह व मुख कर्करोगाच्या बाबतीतही भारत जगात प्रथम क्रमांकावर आहे. याचासुद्धा नागरिक व राज्यकर्त्यांनी विचार करणे गरजेचे आहे.

‘सिट बेल्ट’ नाही लावला तर दंड, हेल्मेट नाही घातला तर दंड. का तर शासन म्हणते आम्हाला काळजी आहे, म्हणून हे नियम पाळा. परंतु विनापरवाना तंबाखूविक्री सर्रास केली जाते. तरूण-तरूणी बेधुंदपणे शाळा-महाविद्यालयाच्या परिसरात तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थांची विक्री व वापर होतो. ते करणाऱ्या व्यक्तीवर कोणतीही कारवाई होत नाही. त्याला दंड केला जात नाही. हीच परिस्थिती बदलणे माझ्यासाठी गरजेची वाटते. ज्या ठिकाणी तंबाखु विक्री केली जाते किंवा तिचा वापर केला जातो, याबाबत शासन का काळजी करत नाही? लोकांच्या जीवाची खरोखर शासनाला पर्वा असेल तर त्यासाठी चर्चासत्र आयोजित करुन शासनाने तंबाखुजन्य पदार्थांच्या व्यसनाबाबत जागरुक होऊन तरुणांना व्यसनापासून परावृत्त करण्यासाठी कार्यशाळा घेणे गरजेचे आहे. व्यसनाधिनता आटोक्यात आणण्यासाठी शासनाने प्रथम शासकीय कर्मचारी व पोलिस कर्मचारी शोधून त्यांच्यातील व्यसनाधिन शोधून त्यांचे समुपदेशन व प्रबोधन करणे प्रथम गरजेचे आहे. शासकीय कर्मचाऱ्यांनी जर नियम पाळले तर नक्कीच जनतेला समजावून सांगणे सोपे होईल. अशा पद्धतीने जर शासनस्तरावर दररोज आपण नियम पाळले तर 31 मे रोजी तंबाखु विरोधी दिन साजरा करण्याची वेळच येणार नाही. तंबाखू ही एक वनस्पती असून त्याची पाने वाळवून त्यावर प्रक्रिया करुन ते खाण्या-चघळण्यायोग्य केले. जामार तंबाखूमध्ये प्रामुख्याने निकोटीन हा घटक चेतासंस्थेवर उत्तेजक म्हणून कार्य करतो. त्यामुळे मानसिक दृष्ट्या खचलेले किंवा शारीरिक कष्ट करुन थकलेले कामगार या व्यसनाला बळी पडतात. प्रामुख्याने लेखक, कवी किंवा कलाकार, पत्रकार अथवा ज्या प्रोफेशनमध्ये जास्त वैचारीक काम असते त्या क्षेत्रातील व्यक्ती तंबाखुला उत्तेजक म्हणून वापर करतात. त्याचे रुपांतर व्यसनात होते. काही व्यसनाधीन लोक आम्हाला सकाळी-सकाळी मलविसर्ग होत नाही असे संगतात. मात्र, त्याऐवजी गरम पाण्यात लिंबू पिळून प्राशन केल्यास मलविसर्ग होईल.

डॉ. विशाल जाधव
नाशिक



**तंबाखूचे प्रकार :** धुम्रपान करण्यायोग्य तंबाखू, विडी, सिगारेट, हुक्का चघळण्यायोग्य तंबाखु - जर्दा, खर्रा, गुटखा, पानामध्ये टाकली जाणारी तंबाखु, मिश्री तंबाखुमधील मुख कर्करोगास कारणीभूत घटक.

**चघळणाऱ्या तंबाखुमधील घटक** - पोलिसायक्लिक ऑरोमेटीक हायड्रोकार्बन, नायट्रोसायक्लिन, अमाईन, नायझेसोप्रोलिन, पोलोनियम, निकोटीन, धूम्रपान तंबाखुमधील घटक, कार्बन मोनॉक्साईड, फायोसायनाइट, हायड्रोसायनाइड, निकोटीन, व्यसन जडल्याची पाच लक्षणे, सतत तंबाखु खाण्याची इच्छा होणे, मनावरचा ताबा सुटणे, तंबाखु खाणे सक्तीचे वाटणे, परिणामाचा विचार न करता सेवन करणे, तंबाखु खाण्याचा कालावधी वाढत जाणे.

**तंबाखूचे दुष्परिणाम :** दातांचा स्वच्छ सफेद रंग जावून तांबूस किंवा पिवळसर होणे. हिरड्यांची जाडी कमी होऊन दातांमध्ये फटी तयार होणे, तोंडाचा वास येणे, तोंडातील श्लेष्मल त्वचेतील ग्रंथींचा रंग बदलणे, तोंडात चव कळणाऱ्या ग्रंथींवर विपरीत परिणाम होणे, सगळ्यात शेवटी तोंडाचा, घसा व अन्ननलिकेचा कर्करोग होणे.

**तंबाखू सोडण्यासाठी उपाय :** तंबाखू मुख्यत्वेने मानसिक थकावा घालवण्यासाठी केले जाणारे व्यसन आहे. त्यामुळे मानसिक तणाव घालवण्यासाठी जे विविध उपाय आहेत ते आपण आपल्या जीवनात अंगिकारने गरलेचे आहे. व्यायाम करणे, फिरणे, अधिक मित्र बनवणे, योग, ध्यानधारणा करणे, मानसिक तणाव अधिक असलेल्या व्यक्तींनी आपले समुपदेशन करून घ्यावी. त्यानुसार मानसशास्त्रीय उपचार करून घेणे. गरजेचे आहे. ■ ■

# दुर्लक्षित कातळ शिल्पे - कोकिसरे, ता. वैभववाडी, जि. सिंधुदुर्ग.

रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यात खूप ठिकाणी अश्मकालीन कातळ शिल्पे आहेत. सुमारे 200 पेक्षा अधिक ठिकाणी 2000 पेक्षा जास्त जांभ्या दगडावर किंवा कातळावरती ही शिल्पे कोरलेली आहेत. त्याचा निश्चित कालावधी उपलब्ध नसला तरी काही संशोधकांच्या मते ही कातळ शिल्पे 2500 ते 5000 वर्षांपूर्वीची आहेत.

यापैकी आणखी एक ठिकाण म्हणजेच सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कोकिसरे गाव. कोकण प्रदेशातील बहुतांश कातळ शिल्पे ही जांभ्या दगडात कोरलेली आहेत. परंतु कोकिसरे येथील कातळ शिल्पे ही नावाप्रमाणे पूर्णतः कातळावर कोरलेली आहेत. वैभववाडी तालुका मुख्यालयापासून 4 कि. मी. अंतरावर व कोकिसरे रेल्वे फाटक (तरळे कोल्हापूर नॅशनल हायवेवरील) येथून 3 कि. मी. अंतरावर नवाळेवाडी-बौद्ध वाडी या जुन्या पायवाट रस्त्यावर कातळ शिल्पे कोरलेली आहेत. नुकतीच या ठिकाणी कुटुंबियांसमवेत भेट दिली. सोबत वाट दाखविण्यासाठी स्थानिक रहिवाशी विजय यशवंत जाधव होते. तसे कोकिसरे माझे आजोळ. माझ्या बालपणी आजोळला जायची ही पायवट या कातळ शिल्पावरून जायची. मोठमोठ्या चौकोनी, आयताकार आकारावरून चालताना बुजुर्ग लोक ही पांडवांची पाऊले आहेत असे म्हणायचे. पण इतकी पाऊले कशी म्हणल्यावर कोणाकडे उत्तर नसायचे. आम्हीही मग विसरून या कातळावरील निसर्ग सौंदर्य म्हणजे बारमाही वाहणारे पाणी व उंचावरून पडणारे पाणी म्हणजे बारमाही धबधबे. पूर्वी ग्रामीण लोक याला वजर (उंच जागेवरून पडणारे पाणी) म्हणायचे. पुढे हा धबधबा कोलांटी उड्या घेत शांती नदीला जाऊन मिळतो.

इंजि. संजय भिकाजी जाधव
वैभववाडी

माझ्या लहानपणी कोकिसरे गावाला कोकणचे कॅलिफोर्निया म्हणायचे. बारमाही शेती, सगळीकडे हिरवेगार मळे, पाटातून झुळझुळ वाहणारे पाणी पाहून मन प्रसन्न व्हायचे. आज लोक शेती करत नसल्याने बारमाही हिरवळ नाहीसी झाली आहे. या ठिकाणी पूर्वी पाणी कातळावरून वहायचे, ते आता शेत जमिनीतून वाहते व शेतातील चिखल, गाळ एके ठिकाणी धबधब्या जवळच कातळावर वाहून आलेला आहे. तरीही येथील बारमाही वाहणारा धबधबा किंवा त्याचे निसर्ग सौंदर्य किंचितही कमी झालेले नाही. उलट कातळावरील पाण्याचा प्रवाह बदलल्याने संपूर्ण कातळशिल्पे दिसत आहेत व पूर्वीचे गैरसमज दूर झालेत. या ठिकाणी असलेली ही शिल्पे ही मानवी पाऊले नसून निश्चित आकार असलेली कातळशिल्पे आहेत. त्याला एक संगती आहे. मोठ्या चौकोनात लहानमोठ्या आयताकृती, त्रिकोणी, चौकोनी, गोलाकार दगडी आकारात ही शिल्पे आरेखली आहेत. जसे आपण दगडी बांधकाम करतो व एकावर एक थर रचतो व त्यातील गॅप छोट्या दगडाने भरून काढल्यावर लांबलचक दगडी भिंतीचे चित्र जसे दिसेल अशी प्रथम दर्शनी ही रचना दिसते. तसेच दगडी बांधकाम केल्यावर जसे सिमेंट किंवा चुन्याने सभोवतालचे थर जोडतो तसेच वाटते.

कोकणातील इतर कातळ शिल्पे ही छोट्या छोट्या आकारात पाहायला मिळतात. पण येथील शिल्पे ही सुमारे अर्धा किमी लांब व 20 ते 30 मिटर



रुंदीच्या पट्ट्यात बऱ्याच ठिकाणी सलग रेखाटलेली आढळतात. दोन ठिकाणी तर मुसळ आत जाईल अशा पद्धतीचे होल आहेत. पूर्वी येथून पाणी वाहायचे, त्यामुळे भूमिगत जलसाठा किंवा भुगर्भधारण यासारखी सुद्धा रचना असू शकते. ही कातळ शिल्प दगडी बांधकाम पद्धतीची रचना पाहता एकवेळ असेही वाटते कि जमिनीच्या पोटात एक प्राचीन नगरच गडप झाले आहे कि काय आणि त्याच्या पाऊलखुणा वरून दिसताहेत, कारण बांधकाम पद्धतीतील असणाऱ्या मोठमोठ्या प्रमाणबद्ध आकारातील भेगा. काही स्थानिक मंडळीच्या मते ही एकादी लिपीही असू शकते.

येथील कातळ शिल्प व प्रमाणबद्द रचना यावर अधिक संशोधन व्हायला हवे. सर्वांनी या निसर्गरम्य ठिकाणी भेट द्यायला हवी व हा अमूल्य पुरातन ठेवा पहायला व जपायला हवा. आवर्जून नक्की भेट द्या. मला मात्र माझे हरवलेले बालपण 40 वर्षानंतर नव्याने भेटले व येथील कातळ शिल्पाची नव्याने ओळख झाली व शिकण्यासाठी आणखी एक विषय मिळाला याचा निश्चितच आनंद आहे. ■ ■

# वाचकांचे मनोगत

## अभिनंदन. तसेच धन्यवाद!

शुक्रवार दि. 30 मे 2025 ला प्रकाशित करण्यात आलेल्या, वेटींग फॉर अ विजा..हा लेख ब.सौ.च्या संपादकांनी प्रकाशित केल्याबद्दल अभिनंदन. तसेच धन्यवाद. हा लेख डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन आत्मचरित्र आहे. ते वाचून वाचकाचे मन आणि भावना क्रोधाने हेलावून जातात. हिन्दु, जातीयवादी, किळसवाणी प्रथेची फक्त जातीची वर्णवादी व्यवस्था समूळ नष्ट करणे अतिशय महत्वाचे होते आणि अजूनही जातीवाद आहे. सवर्णांच्या मनाच्या कुशीत, कुपीत खोलवर दडलेला आहे. तेव्हा जागृत व स्वाभिमानी व्यक्तींनी तो समूळ नष्ट करण्यासाठी अग्रेसित असणे गरजेचे आहे. आपण या लेखाद्वारे वाचकांपर्यंत उदात्त अशी अमोलिक माहीती पुरविली त्याबद्दल आपले आणि संपादकाचे मनःपूर्वक आभार. धन्यवाद व अभिनंदन... ■ ■

– एन. व्ही. बहादुरे

## तुम्हाला काय वाटते ?

खूप सुंदर मांडणी आपण यावर व्यक्त केलेले विचार सराहनीय आहेच. यात वैष्णवीने आत्महत्या करणे हे पळपुटेपणा व हा काही पर्याय नव्हताच हे मान्यच. पण यात तिने घेतलेला निर्णयही हा या व्यवस्थेचा भाग आहे असे मला वाटते. यात मयुरी हिचाही अनन्वित छळ होतच होता. तिने मात्र घर सोडून माहेरी राहिली. वैष्णवी मात्र घरच्या प्रतिष्ठेपायी व तोंड दाबून बुक्याचा मार मिळत असल्याने सहन करीत राहिली. ती क्रांतिकारी पाऊल उचलून तसे करु शकली नाही. कारण सासरचे राजकारणातील लोकांचे येणे जाणे, वरपर्यंत पोहचणारे हात, गुंडप्रवृतीच्या लोकांशी हितसंबंध यात ही बळी पडली. त्यामुळे तिच्या माहेरच्याही लोकांची गळचेपी झाली. याच सर्व प्रकारांमुळे माहेरचे लोकही महागड्या वस्तु देऊन बोळवन करून मुलीच्या भावना जपण्याचा प्रयत्न करीत होते. पण हगवणे कुटुंबाची मानसिकता नीच व पैश्याची हाव असल्याने त्यांना वैष्णवीचा अतोनात छळ करीत असल्यानेच हे पाऊल उचलावे लागले असेल असे मला वाटते. गुंड प्रवृत्ती व राजकारण्याशी हितसंबंध, पोलीस प्रशासनावर वचक असल्याने ती काही करू शकली नसेल, हेच या आत्महत्तेसाठी प्रवृत्त होण्यास कारणीभूत आहे. हेच कारण असावे असे मला वाटते. ■ ■

– रंगराज गोस्वामी

आत्महत्या हा पर्यायच चुकीचा आहे. म्हणून स्वतःच्या पायावर उभे राहणे किती आवश्यक आहे. मुलीने अन्याय सहन करणे हा ही गुन्हाच आहे. तिने एवढा अत्याचार सहन करण्यापेक्षा संविधानाने महिलांना एवढे अधिकार प्राप्त करून दिले आहेत. खरेच प्रिती खूप छान लेख लिहिला. ■ ■

– शालिनी मेश्राम

# वरखेड मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश

## (सत्य कथन)

*संत गाडगेबाबा व संत तुकडोजी महाराज यांचा कालखंड एकच आहे. पण काही दुर्मिळ घटनांचा उल्लेख मी ‘आठवणीतील दिवस’ या पुस्तकात केला आहे. त्यातील काही भाग आपल्यापुढे लेखणीबद्ध स्वरुपात सादर करीत आहो.*

सन 1935 साली सालबर्डीच्या महायज्ञानंतर संत तुकडोजी महाराज हे नाव जनमाणसात पोहोचले. त्यांचे गुरु संत आडकोजी महाराज हे वरखेड येथे समाधिस्थ झाले. वरखेड हे गाव मंजुळाबाईचे माहेर तर राष्ट्रसंतांच्या मामाचे गाव होय. जन्मापासून तर मरेपर्यंत राष्ट्रसंतांचे जिव्हाळ्याचे नाते वरखेड गावासोबतच राहिले.

दिनांक - 15 नोव्हेंबर 1921 साली आडकोजी महाराज 100 वर्षांचे होऊन वारलेत. आता पक्के मंदिर उभे असलेल्या ठिकाणी एक साधारण मातीचा ओटा होता. ती जागा वरखेडातील भक्त श्रीमंत बोके कुटुंबीयानी व गावकरी लोकांनी आडकोजी महाराज यांच्या मरणाच्या आधीच जागा विकत घेतली होती. तिथे पूर्वी मातीचा ओटा, टीनाचे छप्पर होते व साधारण मंदिर बांधले होते. बांधकामाची सुरुवात सन 1929 मध्ये झाली. तोपर्यंत समाधी स्थळ तयार होते. पण या वरखेडच्या मुख्य समाधी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश बंदी होती.

गाव - वरखेडचे ग्रामस्थ आडकोजी महाराज मंदिर कमिटीतील देविदास बोके, हरी गोविंद कडू, कृष्णराव भुते, रामकृष्ण बोके, विठ्ठल बोके या मंडळींनी वरखेडच्या आडकोजी समाधी मंदिरात महार - मांगांना प्रवेश द्यावा याविषयी नाराजी होती व गावातील महार मंडळी चुकूनही मंदिराच्या आसपास जात नव्हते. कारण तेव्हाच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शैक्षणिक व वैचारिक चळवळ त्यांना समजली. म्हणून मंदिर प्रवेश हा महारांचा मुद्दा केव्हाच नव्हता. पण गावातील उच्चवर्णीयांची मानसिकता भेदाभेद जातीयवादीच होती. यावर राष्ट्रसंतांनी कधीच ठोस बाजू मांडली नाही. महार - मांगांना मुख्य मंदिरात प्रवेश देण्याकरिता इतर मंडळी अजिबात तयार नव्हती. गावरैट्यापुढे व वरखेडच्या मंडळी पुढे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज हतबल झाले. योग्य संधीची वाट पाहत होते. दि. 27 नोव्हेंबर 1936 रोजी वैरागमूर्ती गाडगे महाराज वरखेड येथे आले होते. तेव्हा वरखेड गावच्या सर्व सदस्यांनी त्यांना वंदन करून आडकोजी महाराजांच्या मंदिरामध्ये चालण्याची विनंती केली.

संत गाडगे महाराज मंदिरात गेलेच नाही. त्यांना राष्ट्रसंत सारखी कल्पनेवर आधारित असलेली गुरु परंपरा कदाचित मान्य नसेल. देवधर्म, मंदिर, पूजा, देऊळ हे त्यांना मान्य नव्हते. हा मोठा वैचारिक फरक ‘राष्ट्रसंत तुकडोजी महाराज व वैराग्यमूर्ती गाडगे बाबां’मध्ये दिसून येतो. यावरून कर्मयोगी गाडगेबाबांचे विचार कितीतरी शुद्ध परिवर्तनवादी होते हे प्रकर्षाने दिसून येते. तसेच किती श्रेष्ठ दर्जाचे त्यांचे विचार होते याची प्रचिती येते.

वैराग्यमूर्ती - गाडगे बाबा हे गाव - वरखेडच्या गावकरी भक्तांना अजिबात बळी पडले नाही आणि कुणाच्या घरीही गेले नाहीत. त्यांनी नेहमी ठरल्याप्रमाणे गावच्या ओट्यावरच प्रबोधनात्मक किर्तन केले. त्यांनी पहिल्यांदा गाव - तारखेडकडे जाणाऱ्या नदीकाठची जागा स्वच्छ केली, पूर्ण झाडझुड करून सफाई केली. पटांगण स्वच्छ केले नदी काठावरच रात्रभर पिंपळाच्या झाडाखाली मुक्काम केला. ‘संत गाडगेबाबा पाटलाच्या घरी गेले नाही आणि मंदिरातही गेले नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या भेटीला सुद्धा गेले नाहीत. तेव्हा राष्ट्रसंत तुकडोजी महाराज वरखेड येथेच मुक्कामी होते.

रवी दलाल
मो. 9960627818

नंतर दुसऱ्या दिवशी संत गाडगेबाबांनी आपल्या कीर्तनास सुरुवात केली. त्यांचे कीर्तन ऐकण्याकरिता लांबून गाव - गावचे लोक खासार बंड्या घेऊन आले होते. हे कीर्तन ऐकण्याकरिता खुद्द तुकडोजी महाराज पण नदीकाठी हजर होते आणि खाली बसुन त्यानी किर्तन ऐकले. पण त्याकाळी राष्ट्रसंतापेक्षा गाडगेबाबा हे नाव फारच मोठे होते. वयाने व मानाने सुद्धा मोठे होते. संत गाडगेबाबा कधीच मंदिरात गेले नाही आणि राष्ट्रसंत हे प्रत्येक गावागावातल्या मंदिरात जाऊन पाया लागल्याशिवाय पुढे जात नव्हते. हा फरक दोन महात्म्यात होता.

दि. 27 नोव्हेंबर 1936 रोजी संत गाडगेबाबा यांनी वरखेडमध्ये येऊन दाखवून दिले की मला मंदिरात जाऊन कुणाच्या पाया पडण्याची गरज नाही. ही गोरगरीब - रंजली - गांजली जनता शिक्षणाने पुढे जायला पाहिजे. मंदिरात जाऊन यांची प्रगती होणे





नाही. हे त्यांना पूर्ण ज्ञात होते. शिक्षणातूनच सामाजिक प्रगती होऊ शकते हा त्यांचा ठाम विचार - विश्वास होता. गाडगेबाबा हे पाया पडणे व दुसऱ्याला पाया पडू देणे या फालतू भानगडीत कधीच पडेल नाही. आपल्या कीर्तनातून त्यांनी देवधर्म कधीच मांडला नाही. त्यांनी वरखेड गावात येऊन शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले होते. हीच गाडगेबाबांची वरखेड गावात पहिली आणि शेवटची भेट होय.

तोपर्यंत वरखेडच्या मुख्य समाधी मंदिरात अस्पृश्यांना प्रवेश नव्हता. नंतर तुकडोजी महाराजांनी वरखेडात सभा घेऊन गावकऱ्यांना संबोधित केले की, ‘महार - मांगांना मंदिरात प्रवेश द्यावा.’ पण वरखेडातील काही मंडळी प्रवेश देण्यास तयार नव्हती. कारण त्याचवेळी महार - मागांसाठी राजनीतीक अधिकाराची लढाई डॉ. बाबासाहेब आंबेडकर पण लढत होते. वरखेडातील स्वाभिमानी महारांनी मंदिर प्रवेशाचा आग्रह कधीच केला नाही आणि बंदीचा विरोध ही केला नाही. वरखेडातील तेव्हाच्या महार लोकांना स्वतःहूनच मंदिरात प्रवेश नको होता आणि वरखेडातील आडकोजी महाराज कमिटीतील काही लोक तेव्हाच्या अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्यास तयारच नव्हते. वरखेडच्या कमिटीमधील लोकांनी राष्ट्रसंताच्या शब्दाचा मान केला नाही. म्हणूनच राष्ट्रसंतांनी भर सभेत एक शपथ घेतली की, ‘जोपर्यंत अस्पृश्यांना तुम्ही मुख्य मंदिरात प्रवेश देत नाही. तोपर्यंत मी पण मंदिरात पाय ठेवणार नाही. त्यांनी ही शपथ सन 1945 ला वरखेड येथे ग्रामवासियांच्या सामोरे घेतली होती. सतत आठ महिने वंदनीय तुकडोजी महाराज वरखेडात येऊन सुद्धा तेव्हा मंदिरात गेले नाही.

नंतर गावातील सभासद मंडळींनी मीटिंग घेऊन नाईलाजाने अस्पृश्यांना मंदिर प्रवेश देण्यास तयार झाले.’ राष्ट्रसंतांची भेट घेऊन समजूत घातली व आम्ही वरखेडातील महार - मांगांना मंदिर प्रवेश देण्यास तयार आहो असे सांगितले. तेव्हाच दि. 07 ऑगस्ट 1946 रोजी वरखेडातील महार - मांगांना मंदिरात प्रवेश मिळाला. तेव्हा वरखेडातील महार वैचारिक दृष्ट्या इतका प्रगत झाला होता की, त्याला मंदिरासोबत काहीच घेणे-देणे नव्हते. कारण डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी यांची शैक्षणिक व राजनीतिक अधिकाराची लढाई - चळवळ वरखेड गावात पण पोहोचली होती. गावातील समाधी मंदिरात जाण्यासाठी व पाया पडण्यासाठी महार मंडळीच उत्सुक नव्हते. तरी राष्ट्रसंतांचा एक मानसन्मान म्हणून गाव - वरखेडचे परसराम रंगारी, मनोहर गडलिंग, नारायण सोनटक्के हे महाराजासोबत मंदिरात गेले होते. विशेष म्हणजे हे समाधी मंदिर राष्ट्रसंतांनी स्वतः बांधले आहे. तरी त्यांना निर्णय घेण्याचा अधिकार नव्हता. ते वरखेडातील बहुजनांना प्रवेश देऊ शकले नाही. मंदिर राष्ट्रसंतांनी लोकवर्गणीतून बांधले होते बोके घराण्याचा सिंहाचा वाटा होताच. अधिकार तर गावातील लोकांचाच होता. हे सत्य होते. महार मांगाना मंदिर प्रवेश त्यावेळी गावकऱ्यांना पटण्यासारखा नव्हता. म्हणूनच वंदनीय राष्ट्रसंतांचे म्हणणे गावकऱ्यांनी मानले नाही व त्यांना शपथ घ्यावी लागली आणि आठ महिने स्वतःच बांधलेल्या मंदिरात ते आले नाहीत. तेव्हा गावकऱ्यांनी शरमेपोटी अस्पृश्यांना प्रवेश दिला होता. सदरची घटना दि. 07 ऑगस्ट 1846 या दिवसाची आहे. अशाप्रकारे वरखेडातील मुख्य मंदिर अस्पृश्यांकरिता खुले झाले. पण दिनांक 14 ऑक्टोबर 1956 पासून महारांचे धर्मांतरित बौद्ध झालेल्या समाजाला कधीच या मंदिरात जाण्याची गरजच पडली नाही. देवधर्म सोडून शिक्षणाची प्रेरणा वैराग्यमूर्ती गाडगेबाबा व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या वैचारिक चळवळीतून मिळाली. हा एक ऐतिहासिक दस्तऐवज व काही घटना सत्य स्वरूपात पुढे ठेवीत आहो. ■ ■

संकलन - हंसराज कांबळे
मो. 8626021520

# उद्धव साबळे यांच्या ग्रामगुजचे प्रकाशन




**नागपूर :** यशवंतराव चव्हाण विकास प्रशासन प्रबोधिनीचे राज्यस्तरीय प्रशिक्षक आणि रोजगार संघाच्या माध्यमातून असंख्य गावांमध्ये सातत्याने सहभागी असणारे रोजगार संघाचे सरचिटणीस उद्धव साबळे यांनी लिहिलेल्या 'ग्रामगुज' या पुस्तकाचे प्रकाशन नुकतेच झाले. डॉ. गिरीश गांधी फाउंडेशन नागपूरच्या वतीने आयोजित करण्यात आलेला हा प्रकाशन सोहळा स्थानिक शंकर नगर चौकातील बाबुराव धनवटे सभागृहात थाटात पार पडला. प्रकाशन समारंभाच्या अध्यक्षस्थानी जेष्ठ संपादक बाळ कुलकर्णी होते. पुस्तकाचे प्रकाशन नागपूर विभागीय आयुक्त कार्यालयातील डॉ. कमल किशोर फुटाणे अप्पर आयुक्त विकास यांच्या हस्ते करण्यात आले यात्प्रसंगी प्रमुख अतिथी म्हणून डॉ. गिरीश गांधी फाउंडेशनचे कार्याध्यक्ष श्रीराम काळे, रोजगार संघाचे संचालक प्राध्यापक संजय नाथे, प्रिया वंजारी, अजय पाटील, डॉ. कोमल ठाकरे व्यासपीठावर उपस्थित होते. पुस्तक प्रकाशन समारंभात बोलताना डॉ.कमलकिशोर फुटाणे म्हणाले, पारंपरिक रूढी परंपरांचा त्याग करणे हे ग्रामीण माणसांना कठीण जाते त्यामुळे ग्राम निर्माण अत्यंत क्लिष्ट प्रक्रिया आहे. ग्राम निर्माण म्हणजे केवळ भौतिक बदल नव्हे तर तो एक समग्र परिवर्तनाचा विचार आहे. खेडेगावातील माणसांच्या जीवनशैलीत, विचारसरणीत आणि आचार धर्मात सकारात्मक परिवर्तन घडविणे हे त्यात महत्त्वाचे असते असे नमूद करीत ग्रामगुज मधील विचार सामान्य माणसांना विचार करायला भाग पाडणारे आहेत. कोरोना काळात जेव्हा सगळे संपले असे सर्वांना वाटायला लागले तेव्हा उद्धव साबळे यांनी रोजगार संघाच्या माध्यमातून ग्राम विकास साधण्यासाठी 'एक सरपंच एक विषय' हा उपक्रम यशस्वीपणे राबविला. त्यात लोकसभागातून गावातील भकास पडलेल्या स्मशानभूमीचा विकास करण्यासाठी अभिनव प्रयोग त्यांनी केले. सर्वत्र वाईट विचारांची उधळण होत असताना चांगल्या विचारांची पेरणी ही ग्रामगुज सारख्या पुस्तकांच्या माध्यमातून होत असल्याचे त्यांनी नमूद केले. श्रीराम काळे यांनी ग्रामगुज पुस्तकाचे कौतुक करत ग्रामगुज हे ग्राम स्वराज्याच्या दृष्टीने महत्त्वाचे पुस्तक असल्याचे सांगितले. ग्रामगुजमध्ये रवींद्रनाथ टागोर यांचेपासून महात्मा गांधी, राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, विनोबा भावे यासारख्या महान व्यक्तींच्या विचारांचा आधार घेत ग्रामीण जनतेला विकास कार्यासाठी उद्धव साबळे यांनी प्रवृत्त केल्याचे मत अध्यक्ष पदावरून बोलताना ज्येष्ठ संपादक बाळ कुलकर्णी यांनी मांडले. संजय नाथे यांनी पुस्तकाची उपयुक्तता विशद केली. कार्यक्रमाला डॉ. गिरीश गांधी, आशुतोष शेवाळकर, अरुणा सबाने,वंदना महात्मे, विजय लिमये,भाष्करराव भोंडे,प्रमोद ईखे, डॉ.प्रमोद सातांगे आदी मान्यवर उपस्थित होते. प्रास्ताविक डॉ. कोमल ठाकरे यांनी तर संचालन रेखा दंडीगे- घिया यांनी केले.

# सोमवारपासून गोंदिया जिल्ह्यात धम्मप्रचार मोहीम



**गोंदिया :** धम्म प्रचार करण्यासाठी प्रज्ञा मैत्री प्रतिष्ठान नागपूरचे अध्यक्ष तथा बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर आंतरराष्ट्रीय धम्म अकॅडमी, राजुलवाडी तालुका उमरेडचे धम्म शिक्षक तथा सामाजिक न्याय विभागाचे माजी अप्पर सचिव श्याम तागडे यांचा गोंदिया जिल्ह्यातील विहारांना भेटी देण्याचा तीन दिवसाचा धम्म प्रचार मोहीम कार्यक्रम दि. 2 जून 2025 पासून आयोजित करण्यात आला आहे. धम्मशिक्षक तथा माजी अप्पर सचिव (आय.ए.एस) श्याम तागडे आय. ए. एस. हे धम्म प्रचार व प्रसार करण्यासाठी तसेच भगवान बुद्धांचे धम्मनुसार आचरण, ( धम्मचरिया) केल्यास आपले सांसारिक व व्यवहारिक जीवनात त्याचा काय उपयोग होईल तसेच अष्टांगीक मार्गातील सम्मा सती याचे अंगीकार करून पत्सना केल्याने कसे सुखपूर्वक जीवन जगता येते, याबाबत गोंदिया जिल्ह्यातील विहारांना भेटी देऊन उपासक उपासिका यांना विपशना शिबिराचे लाभ घेण्यासाठी मागदर्शन / चर्चा करणार आहेत. त्यासाठी धम्म शिक्षक शाम तागडे 2 जून 2025 ला तिरोडा,गोरेगाव, गोंदिया तालुका व 3 जून 2025 ला आमगाव, सालेकसा व देवरी तालुका आणि 4 जून 2025 ला सडक अर्जुनी व अर्जुनी मोरगाव तालुक्याचा दौरा करणार आहेत. अशी माहिती प्रतिष्ठानचे धम्मप्रचारक भंडारा येथील विनोद रामटेके यांनी कळविली आहे. याप्रसंगी जिल्ह्यातील भेटी देण्यात येणाऱ्या नियोजित विहाराचे प्रतिनिधी, उपासक व उपासिका यांनी ठरविलेल्या व कळविण्यात आलेल्या वेळेत व तारखेला हजर राहावे असे प्रतिष्ठानचे सडक अर्जुनी येथील धम्म प्रचारक अशोककुमार लांजेवार यांनी गोंदिया जिल्ह्यातील उपासक, उपासिका यांना आवाहन केले आहे.




**विश्वशांती बुद्ध विहार (बोडखीपुरा) वकील पेठ नागपूर** नियमित वंदना, विविध सामाजिक, महापुरुष यांच्या जयंती पौर्णिमा वर्षा वास, कार्यक्रमांचे आयोजन होत असतात. वसाहतीतील लहान मुलांचे संस्कार शैक्षणिक वर्ग चालविल्या जात असतात.

मिलिंद रामटेके (9766647933) , प्रज्ञा रामटेके, जनार्धन देशपांडे, भगवान कांबळे, गिरजा पानतावणे, रेखा रंगारी. विहाराचे व्यवस्थापन सांभाळत आहेत.

संवाद मित्र, डी.आर. कांबळे
8600924170

## महत्वाचे

### बहुजन हिताय संघ ही प्रज्ञावंतांची सभा



**नागपूर :** बहुजन हिताय संघाची 421 वी साप्ताहिक सभा डॉ. बाबासाहेब आंबेडकर मिशन येथे सकाळी 9.00 वाजता झाली. अध्यक्षस्थानी डॉ. रमेश भीया राठोड अतिथी धम्मपाल देशभ्रतार होते. दि 25 मे ते दिनांक 31 मे पर्यंत च्या आठवड्यात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी केलेल्या महत्वपूर्ण उल्लेखनीय कार्याचे दिनविशेष वाचन प्रकाश सोनटक्के तर देविदास राऊत यांनी सुत्तपठण करतांना श्रावस्तीच्या श्रीमंत व्यापा-याची कथा सांगितली. धम्मपाल देशभ्रतार यांनी सांगितले की,धम्मपद हा तथागत बुद्धांच्या वाणीचा अनमोल ग्रंथ आहे. बुद्ध वाणी उत्तम प्रकारे समजावून सांगितले. अध्यक्षस्थानी ॲड. रमेश भीया राठोड यांनी सांगितले की, हि सभा प्रज्ञावंतांची सभा आहे. धम्मबंधू हेच आमचे खरे नातलग आहोत असे सांगितले या प्रसंगी वामन सोमकुवर यांचा सत्कार करण्यात आला. राष्ट्रगीते प्रा नंदा भगत, संचालन डॉ. शंकर खोब्रागडे आभार ॲड. हंसराज भांगे यांनी मानले.

### वानाडोंगरी परिसरात तिव्र पाणीटंचाई



**हिंगणा :** वानाडोंगरी नगर परिषद परिसरात भिषण पाणी टंचाई निर्माण झाली असून ही पाणीटंचाई दूर करण्यासाठी उबाठा शिवसेना पक्षाच्या वतीने नगर परिषद मध्ये भेट देऊन पाणी समस्या बाबत चर्चा करुन निवेदन देण्यात आले.नगरपरिषदेच्या वतीने लवकरात लवकर घर तिथे नळाचे नियोजन करावे व सध्या कमीत कमी दोन दिवसा आड नळाद्वारे पाणीपुरवठा करण्यात यावा. तसेच ज्या प्रभागात नळ नाही.त्याठिकाणी टँकरने पाणीपुरवठा करण्यात यावा. सर्व बोअरवेलची दुरुस्ती करून सुरु करण्यात यावे व वानाडोंगरी परिसरामध्ये लवकरात लवकर मोठ्या प्रमाणावर पाणीपुरवठा योजना सुरु करण्यात यावी. जनतेला झालेला त्रास शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडुन सहन केला जाणार नाही अन्यथा मोठ्या प्रमाणात मटका फोडो आंदोलन करण्याचा इशारा देण्यात आला. पक्षाच्या वतीने पाणी पुरवठा अभियंता निलेश नंदनवार यांना निवेदन देण्यात आले. यात्प्रसंगी रवि जोडांगळे, समाधान माने, अतुल करंडे, सुकन्या थडकर, गजेंद्र काकडे, शोभा पाठोडे, मिथलेष बिंग, उषा टाक, निर्मला यादव, अश्विनी कोडापे, अरुणा मेश्राम, मुलताज खान, सिमा चौरसिया, सोनम व्यास, लक्ष्मी खडसे व राजकुमारी नागवंशी उपस्थित होते.

### गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व मोफत शालेय साहित्य वाटप



**नागपूर :** बेसा डॉ. इंगळे करिअर इन्स्टिट्यूट व राजगृह बहुउद्देशीय संस्था बेसा नागपूर यांच्या संयुक्त विद्यमाने दहावी व बारावी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी, अमित ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूटचे संचालक माननीय आशिष नखाते कार्यक्रमाचे उद्घाटक माननीय धनराज पी बडोले व डॉ. करिअर इन्स्टिट्यूटचे संचालक व मुख्य मार्गदर्शक माननीय डॉ. शुभम इंगळे होते या कार्यक्रमाचे संचालन कीर्ती विनोद बागडे यांनी केले तर आभार प्रदर्शन सौरभ शिर्के यांनी केले जवळजवळ 30 ते 40 विद्यार्थ्यांना मोफत शालेय साहित्य वाटून गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. गरीब होतकर विद्यार्थ्यांना भविष्यात शालेय साहित्याची आवश्यकता पडल्यास संपूर्ण शिक्षणाची जबाबदारी व खर्च आम्ही करू असे आवाहन कार्यक्रमाचे उद्घाटक मान्य धनराज पी बडोले यांनी केले कार्यक्रमाचे यशस्वी करिता पल्लवी तलमले दिनेश गोडबोले सौरभ शिर्के हैदर यांनी अथक परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वीरित्या पार पडला.

### महावितरणच्या 'रन फॉर सेफ्टी' मॅरेथॉनला उत्स्फूर्त प्रतिसाद




**नागपूर :** महाराष्ट्रात विजेमुळे होणारे अपघात टाळण्यासाठी आणि नागरिकांमध्ये विद्युत सुरक्षिततेविषयी जनजागृती करण्यासाठी महावितरणने आपल्या 20 व्या वर्धापनदिनानिमित्त 'विद्युत सुरक्षा सप्ताह'चा (1 ते 6 जून) प्रारंभ रविवारी (दि. 1 जून) 'रन फॉर सेफ्टी' मॅरेथॉनने केला. या मॅरेथॉनला नागपुरात उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. नागपूर परिमंडलाचे मुख्य अभियंता दिलीप दोडके यांच्या हस्ते विद्युत भवन येथे या मॅरेथॉनचे उद्घाटन झाले. यावेळी बोलताना दोडके यांनी 'महावितरणमध्ये शून्य अपघात, महाराष्ट्रात शून्य' ही या सप्ताहाची संकल्पना असल्याचे सांगितले. नागरिकांमध्ये विद्युत सुरक्षिततेबद्दल जागरूकता निर्माण करणे आणि अपघातांचे प्रमाण कमी करणे हा यामागचा मुख्य उद्देश असल्याचे त्यांनी स्पष्ट केले..

# भूमी मुक्ती मोर्चा व बहुजन मुक्ती मोर्चाचा जिल्हाधिकारी कार्यालवार हल्ला बोल

**बुलडाणा :** भूमी मुक्ती मोर्चा व बहुजन मुक्ती मोर्चा बुलडाणा संयुक्त संघटनेचे वतीने जिल्ह्यातील भुमिहिन वन व महसुल विभाग अतिक्रमकावर अन्याय, अत्याचार, प्रलंबित आदिवासी जमिन पट्टे, शेतकरी व भुमिहीनांची 100 टक्के कर्जमुक्ती, निवासी घर पट्टे, जिल्हातील महसुल व अतिक्रमीत जमिनीवर प्रस्तावित व मंजुर, सौरऊर्जा, पुनरवर्सन, वाढीव गावठाण, ग्रामीण रुग्णालय व खेळाचे मैदान प्रकल्पांना स्तगीती द्या तसेच माळेगाव येथील दलित आदिवासी अन्याय चौकशी व तात्काळ निवाऱ्याची जमीन व घरकुल मंजूर करा. जिल्हातील महसूल वन जमीन पेरणी आदेश करा. आदी मांगण्यासाठी भाई प्रदीप अंभोरे संघटना प्रमुख यांचे प्रमुख मार्गदर्शनात बुलडाण्यात भूमिहीनांचा हल्ला बोल आंदोलन भीमराव खरात, रमेश गाडेकर, शेषराव चव्हाण, सुभाष घुगे, भगवान गवई, भाई मधुकर मिसाळ, यांचे नेतृत्वात जयस्तंभ चौक परिसरात महापुरुषांच्या पुतळ्यास माल्यर्पण करून करण्यात आले. जिल्ह्यातील प्रलंबित मागण्या बाबत, माळेगाव आदिवासी निवास घरे जमीन बाबत 10, 12 दिवसात पूर्तता करण्याचं जमीन उपलब्ध करून त्यांचे घरकुल योजनेत समावेश केल्या जाईल. असे आश्वसन जिल्हाधिकारी यांनी दिले. यावेळी सलीमभाई, रामेश्वर चव्हाण, शेषराव चव्हाण, मधुकर मिसाळ, सुभाष घुगे, ज्ञानदेव मिसाळ, भरत मुंडे, इलीयस भाई, रोशन वाकोडे, गजानन जाधव, महेंद्र गवई शिस्टमंडळाशी जिल्हाधिकारी यांचेशी प्रदीर्घ चर्चा करून निवेदन राज्य सरकार ला सादर केले. सदर मागण्याबाबत तात्काळ शासन स्थरीय बैठक तात्काळ घेऊन मागण्याची पुर्तता करा. अन्यथा राज्यभरतील बहुजन भूमिहीन अतिक्रमण धारकांच्या भूमिहक कर्जमुक्ती अन्याय अत्याचार व सामाजिक न्याय दो मागण्या बाबत मुंबई मंत्रालयावर 11 जून 2025 ला, हजारोंचा सत्याग्रह आंदोलन करण्यात येईल. असा इशारा भाई प्रदीप अंभोरे संयुक्त संघटना प्रमुख यांनी भूमिहिनांचा हल्ला बोल आंदोलन मार्गदर्शनाच्या वेळी सरकार ला दिला. प्रसंगी भाई बाबुराव सरदार यांचे मातोश्री सुशीलाआई सरदार यांना संघटनेच्या वतीने भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण करण्यात आली. आंदोलनात जिल्ह्याभरातील शेकडो अन्यायग्रस्त भूमिहीन अतिक्रमण धारक उपस्थिती होती.आंदोलनाच्या यशस्वीतेसाठी भरत मुंडे, संजय पाटील, सारंगधर टापरे, रमेश इंगळे, महेंद्रा भास्कर, नाना तायडे, मिलिंद वानखेडे, ईलायस भाई पठाण, सूपडा इंगळे, अनिल कांबळे, अशोक सोनारे, महिन्द्रा गवई, रामेश्वर चव्हाण, सुनील दांडगे, आशाताई मोरे, कमलबाई वानखडे, अनिस पठाण, गजानन जाधव, आदींनी अथक परिश्रम घेतलेत.



# चिचोली शांतीवनात निवासी शिबिरार्थींची निशुल्क आरोग्य तपासणी



**नागपूर :** वाडी खडगाव जवळ असलेल्या शांतीवन बुद्धविहार चीचोली परिसरात दहा दिवसीय बाल संस्कार आणि व्यक्तीमत्व विकास शिबिराच्या निवासी विद्यार्थ्यांची शनिवारी दुपारी नागपूरच्या राऊत मल्टी स्पेशलिस्ट हॉस्पिटल ने निशुल्क आरोग्य तपासणी करून आपले सामाजिक दायित्व निभवले.

संत गाडगे बाबा आश्रम आणि बुद्ध विवार समन्वय समिती द्वारा ग्रीष्मकालीन शालेय सुट्ट्या लक्षात घेता शालेय विद्यार्थ्यांसाठी शांतीवन बुद्ध विहार येथे बाल संस्कार आणि व्यक्तीमत्व निवासी शिबीर संपन्न होत आहे. या शिबिरात नागपूर विदर्भ,मध्य प्रदेश येथील 13 ते 16 वर्ष वयोगटातील 140 शालेय विद्यार्थी विद्यार्थिनी सहभागी झाले आहेत.

शांतीवन बुद्ध विहारचे प्रमुख संचालक संजय पाटील यांच्या सहकार्याने आयोजित या बालसंस्कार आणि व्यक्तिमत्व विकास निवासी शिबिर चे मुख्य आयोजक अशोक सरस्वती बौद्ध, डॉ. प्रमिला चिंचखेडे, सतीश गायकवाड,बबीता गायकवाड यांनी निशुल्क तपास करणारे डॉ. चैतन्य गुल्हाने, राजेश मासुळकर, दीक्षा राऊत यांचे स्वागत केले. हॉस्पिटलचे संचालक डॉ. पराग राऊत तसेच वाडी चे सामाजिक कार्यकर्ते डॉ. बीप्लव मुजुमदार यांचे या आरोग्य तपासणीसाठी विशेष सहकार्य लाभले. शिबिराचे प्रमुख संयोजक सतीश गायकवाड यांनी उपस्थिताना शिबिराच्या आयोजनाचे उद्देश, कार्यप्रणाली, दिनचर्येची माहिती दिली. त्यानंतर डॉक्टरच्या टीमने शिबिरात सहभागी 140 मुला - मुलींची आरोग्य तपासणी करून आवशक आरोग्य विषयक मार्गदर्शन व उपाय सुचविले. शिबीरार्थी विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी यशस्वी होण्यासाठी शिबिरातचे स्वयंसेवक सावित्री नखाले, सुषमा पाखरे, वनिता कराडे, सुविता लोखंडे, महेशकर, विजय इंगळे, चहांदे, प्रज्ञा खाकसे, अशोक टेम्भरे, प्रा. राजेंद्र भालशन्कर, यांनी परिश्रम घेतले. प्रा. सुभाष खाकसे यांनी सर्वांचे सहकार्याबद्दल आभार व्यक्त केले.

## भीमजयंती, आंबेडकरी कार्यकर्त्यांच्या जीवनावरील चित्रपट : उमेश म्हैसकर




**नागपूर :** आंबेडकरी कार्यकर्त्यांचा जीवन संघर्ष कसा असतो. एका बिघडलेल्या तरुणाला समाजात मानसन्मानाचे जीवन जगण्यासाठी उभे करण्याची महिलेची धडपड, असंघटित समाजाला संघटित करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे स्मारक उभे करून भीम जयंती साजरी करणारा आजचा तरुण, निळ्या झेंड्याची संघटना व त्यांचे संघटितरित्या राजकारण दाखवणे हा या चित्रपटाचा मुख्य उद्देश असल्याचे या चित्रपटाचे लेखक व निर्माता उमेश म्हैसकर यांनी सांगून आंबेडकरी समाजाने हा चित्रपट बघावा असे आवाहन केले. आज अहिल्याबाई होळकर यांच्या त्रिशताब्दी जन्मदिनी बहुजन समाज पार्टीने भीम जयंती या चित्रपटाचे प्रमोशन करण्यासाठी स्थानिक टिळक पत्रकार भवन येथे या चित्रपटाचे निर्माते यांच्या पत्रपरिषदेचे आयोजन केले होते. त्यात निर्मात्याने आपली भूमिका व्यक्त केली. परिषदेचे संचालन बसपाचे महाराष्ट्र प्रदेश मीडिया प्रभारी उत्तम शेवडे यांनी केले. यात्प्रसंगी पृथ्वीराज शेंडे, नागोराव जयकर, प्रा. नितेश कांबळे, राहुल सोनटक्के, राजकुमार बोरकर, चंद्रशेखर कांबळे, अभिलेश वाहाने, उमेश मेश्राम, अंकित थूल, नितीन वंजारी, विलास पाटील, अभय डोंगरे, संभाजी लोखंडे, जगदीश गेडाम, शामराव तिरपुडे यांचे सहित मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## कामाचे ठिकाणी लैंगिक अत्याचार गंभीर स्वरूपाचा गुन्हा : ॲड. महेंद्र गोस्वामी

**पवनी :** ग्रामीण रुग्णालय येथे (दि. 30) ला महिला तक्रार निवारण समितीतर्फे रूग्णालयातील महिला कर्मचारी आणि शिकाऊ विद्यार्थ्यांसाठी कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या अनुषंगाने घालून दिलेल्या मार्गदर्शन तत्त्वावर कार्यशाळेचे आयोजन ग्रामीण रुग्णालयाचे वैद्यकीय अधीक्षक डॉ. धीरज लांबट यांचे अध्यक्षतेखाली करण्यात आले होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक म्हणून माजी न्यायाधीश ॲड. महेंद्र गोस्वामी उपस्थित होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. विनय मासुरकर, समितीचे पदाधिकारी डॉ. संगीता देशमुख, शाहिद अली, डॉ. माधुरी खोब्रागडे, परिचारिका ललिता अल्लीवार, रविकांत वाढाई, जगदीश कामडी प्रमुख्याने उपस्थितीत होते.



यावेळी प्रमुख मार्गदर्शक ॲड. महेंद्र गोस्वामी म्हणाले की सर्वोच्च न्यायालयाने स्त्रियांच्या कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाच्या अनुषंगाने घालून दिलेली मार्गदर्शक तत्त्वे आहेत. त्यानुसार महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने 19 सप्टेंबर 2006 रोजी शासन निर्णय पारित केला. त्यामध्ये शासकीय, निमशासकीय सेवेतील महिला कर्मचाऱ्यांच्या लैंगिक छळाच्या समस्यांची तपासणी करण्यासाठी शासनाने नियुक्त केलेल्या समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी आणि त्या अनुषंगाने सर्व कार्यालयात, संस्थात समित्या स्थापन करण्याचे आदेश आहे. महिला जर त्यांचे कार्यालयामध्ये लैंगिक छळाला सामोरे जात असतील तर त्यांनी पुढे येऊन न घाबरता तक्रार करा, असे आवाहन केले.तसेच अधिनियम 2013 अंतर्गत विविध कलमांची माहिती दिली. तसेच कामाचे ठिकाण, छळांचे प्रकार, तक्रार कोठे व कशी करावी, अंतर्गत तक्रार निवारण समितीचे कार्य, तक्रारीचे निराकरण,स्थानिक तक्रार निवारण समितीचे कार्य ,याची सविस्तर माहिती देण्यात आली.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची 300 वी जयंती मोठ्या साजरी



**नागपूर :** अहिल्या मंदिर पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती समिती प्लॉट नंबर 15 अप्सरा लॉन जवळ हुडकेश्वर रोड तर्फे दरवर्षीप्रमाणे या वर्षीही दि. 31 मे शनिवारी पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांची 300 वी जयंती मोठ्या उत्साहाने, आनंदाने व धूमधडाक्यात साजरी करण्यात आली असून त्यानिमित्ताने पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मृती मंदिर सौभाग्य नगर हुडकेश्वर येथील राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला सकाळी 6.30 वाजता. अभिषेक करण्यात आला आणि त्यानंतर 7.30 वाजता. मोटार कार, बाईक रॅली ला सुरूवात करण्यात आली. रॅली च्या मार्ग अहिल्या मंदिर सौभाग्य नागपूर येथून मधुकर काळमेघ, महादेवराव पातोंड, डॉ. रमेश ढवळे यांनी रॅलीला पिवळी झेंडी दाखवून रॅलीची सुरुवात केली. रॅलीमध्ये अहिल्यादेवीचा रथ व त्यामध्ये अहिल्यादेवी, माळसा, खंडेराव, असे पात्र घेतलेले बालक सहभागी होते. रॅली आयोध्या नगर मधून तुकडोजी पुतळा मार्गे पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर चौकामध्ये पोहोचली. या मार्गामध्ये नगरसेविका रुपाली परशूराम ठाकूर, समाजसेविका मगला म्हस्के मॅडम, समाजसेवक व आमच्या समाजाचे भूषण श्यामभाऊ थोरात यांनी चहा बिस्किट व पाण्याची व्यवस्था केली त्यामध्ये त्यांना संजय बन्सोड यांनी सहकार्य केले. समाज बांधवांनी वेगवेगळ्या चौकामध्ये पोस्टर व झेंडे लावून अहिल्यादेवीच्या जयंतीच्या हार्दिक शुभेच्छा दिल्या.

# महाराष्ट्र अंनिसच्या नूतन कार्यकारिणीची घोषणा



**शहादा :** महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या नूतन राज्य कार्यकारिणीची घोषणा विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीत शनिवारी दि. 31 मे रोजी दुपारी करण्यात आली असून अध्यक्षपदी लातूरचे ज्येष्ठ कार्यकर्ते माधव बावगे यांची तर राज्य कार्याध्यक्षपदी संजय बनसोडे यांची एकमताने निवड करण्यात आली. यासह 5 प्रधान सचिव आणि 7 राज्य सरचिटणीस आता पुढील तीन वर्षात प्रभावी नेतृत्व करणार आहेत. राज्यभरातून या बैठकीला 460 कार्यकर्त्यांची उपस्थिती आहे.

लोणखेडा (ता.शहादा) येथील पूज्य साने गुरुजी विद्या प्रसारक मंडळाच्या सभागृहामध्ये महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीची विस्तारित राज्य कार्यकारिणी बैठकीच्या दुसऱ्या दिवशी निवड सहमती समितीचे सदस्य माधव बावगे, सुशिला मुंडे, संजय शेंडे यांनी 2025 ते 2028 पर्यंतच्या त्रैवार्षिक राज्य कार्यकारिणीची निवड जाहिर केली. ज्येष्ठ कार्यकर्ते माधव बावगे (लातूर) यांची अध्यक्षपदी व संजय बनसोडे (इस्लामपूर जि.सांगली) राज्य कार्याध्यक्ष पदावर निवड जाहिर करण्यात आली. राज्य उपाध्यक्ष पदांवर ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे (नाशिक), डॉ.प्रदिप पाटकर (पनवेल), डॉ. अशोक बेलखोले (किनवट ता.नांदेड), संतोष आंबेकर (बुलढाणा), संजय शेंडे (नागपूर), डॉ. रश्मी बोरीकर (संभाजीनगर), शामराव पाटील (इस्लामपूर) यांची निवड करण्यात आली आहे. तर राज्य प्रधान सचिव म्हणून डॉ.ठकसेन गोराणे (नाशिक), विनायक सावळे (शहादा जि.नंदुरबार), गजेंद्र सुरकार (वर्धा), रुक्साना मुल्ला (लातूर), विजय परब (मुंबई) यांच्यावर जबाबदारी सोपवण्यात आली आहे. कार्यकारी समितीत सरचिटणीस म्हणून आरती नाईक (पनवेल), सुरेश बोरसे (शिरपूर जि.धुळे), कृष्णात कोरे (कोल्हापूर), सुधाकर काशीद (सोलापूर), विलास निंबोरकर (गडचिरोली), शहाजी भोसले (छ.संभाजीनगर), उत्तरेश्वर बिराजदार (लातूर) यांचा समावेश आहे. उर्वरित राज्य कार्यकारीणीत विविध विभागांच्या कार्यवाह व सहकार्यवाह यांची पुढीलप्रमाणे निवड झाली. महिला सहभाग, कार्यवाह अमरावतीच्या गायत्री आडे, सहकार्यवाह मुंबईचे रुपेश शोभा, युवा सहभाग , कार्यवाह पनवेलचे प्रियंका खेडेकर, सहकार्यवाह कोल्हापूरचा हरी आवळे, जोडीदाराची विवेकी निवड , कार्यवाह कोल्हापूरचे रेश्मा खाडे, सहकार्यवाह नागपूर येथील कविता मते, जातपंचायत मूठमाती अभियान, कार्यवाह नाशिकचे कृष्णा चांदगुडे, मिश्र विवाह, सत्यशोधकी विवाह, लातूर येथील रणजित आचार्य, प्रशिक्षण व्यवस्थापन, कार्यवाह नंदुरबार येथील कीर्तीवर्धन तायडे, सहकार्यवाह वर्धा येथील डॉ. माधुरी झाडे, वि.जा. प्रकाशन, वितरण कार्यवाह ठाणे येथील प्रा. मच्छिंद्रनाथ मुंडे, मानसिक आरोग्य व्यवस्थापन, कार्यवाह पनवेल येथील डॉ. अनिल डोंगरे, जळगावचे मानसोपचार तज्ञ डॉ. प्रदिप जोशी, सहकार्यवाह बीड येथील अतुल बडवे, जळगावचे विश्वजित चौधरी, विज्ञान बोध वाहिनी, कार्यवाह सांगली जिल्ह्यातील भास्कर सदाकळे, सहकार्यवाह लातूर येथील बाबा हलकुडे, विवेक वाहिनी, कार्यवाह बीड येथील प्राचार्या डॉ. सविता शेटे, सहकार्यवाह परभणी येथील प्राचार्य डॉ. विठ्ठलराव घुले, कागल जि. कोल्हापूर येथील प्रा.डॉ. संतोष जेठीथोर यांचा समावेश आहे. बैठकीला नागपूरातून जिल्हा उपाध्यक्ष सेवक राम राऊत, जिल्हा कार्याध्यक्ष गौरव आळणे, विनोद उलीपवार, अशोक पाटील, सुरेश साखरे, नरेंद्र पाटील, प्रतिभा खोब्रागडे, मालती वराडे उपस्थित होते यावेळी जिल्हा अध्यक्ष जगजीत सिंग यांनी जिल्ह्यातील सर्व कार्यकर्त्यांच्या वतीने नवनिर्वाचित राज्य पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले.

**स्टुडिओ किरायाने देणे आहे**



दैनिक बहुजन सौरभने एक उत्कृष्ट दर्जाचा स्टुडिओ तयार केलेला आहे. बेरोजगार विद्यार्थ्यांसाठी एक आठवड्याचा मोफत कोर्स करण्याचा मानस आहे. ज्या कोणाला नाटक, गाणी, कराओके किंवा फेसबुक रिलवर टाकणारी कोणतीही माहितीसाठी स्टुडिओचा वापर करायचा असल्यास तासाप्रमाणे भाड्याने देणे आहे. अधिक माहितीसाठी संपर्क साधावा.



मो. 8482839451

बहुजन सौरभ प्रकाशक, संपादक, मालक, मुद्रक सिध्दार्थ जीवन कांबळे यांनी देश प्रेस पब्लिकेशन, E-30/2, इंडस्ट्रीयल एरिया, सोनेगाव (सीम), हिंगणा, एम.आय.डी.सी., नागपूर - 440016 येथे मुद्रित केले व 9/2, स्वराज कॉलनी, मेडिकल कॉलेजच्या मागे, नागपूर-440027, येथे प्रकाशित केले. **RNI No. MAHMAR 2020/84035** Printed, Owner by Siddharth Jiwan Kamble, Publisched at 9/2 Swaraj Colony, Behind Medical College, Nagpur 440027, Printed at M/S Desh Publication, E-30/2, Industrial Area, Sonegaon (SEEM), Hingna, MIDC, Nagpur-440016, Editor Siddharth Jiwan Kamble Email: bahujansaurabh@gmail.com Mobile: 9422860648